"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका


**कार्यालय फोन** : २३८७७३०१, २३८८००७३

**WEB SITE** : **http://www.nkgsbsangh.org**

**E-MAIL** : **nkgsbs@gmail.com**


**कार्यालयीन वेळ** : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।। अव्यापारेषू व्यापार:।।

मूल्य रु. ५


क्रमांक ३ वर्ष : ४० ऑक्टोबर-डिसेंबर २०१९


**BOOK POST**

**TO,**


**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

## दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी.संघ आणि
## दि नॉथ कॅनरा जी.एस.बी. इंडस्ट्रीयल अँड एज्यु. सोसायटी
## वार्षिक स्नेहसंमेलन - २०१९

### निमंत्रण पत्रिका

ज्ञातीतील सर्व बंधुभगिनींना नम्र विनंती आहे की आपण सर्वांनी ज्ञातीच्या येत्या वार्षिक स्नेहसंमेलनास उपस्थित राहून शोभा आणावी व कार्यक्रम यशस्वी करण्यास साहाय्य करावे.

**प्रमुख पाहुणे** : डॉ. विवेक श्रीपाद बोरकर
शांतीस्वरुप भटनागर पुरस्कार विजेते व
चेअरप्रोफेसर आय. आय. टी. पवई

**स्थळ** : डॉ. अंटोनिओ डिसिल्व्हा ट्रस्ट हॉल, कबुतरखाना, दादर

**दिनांक** : रविवार २४ नोव्हेंबर २०१९ सायं. ४.१५ वाजता.

### कार्यक्रम

- स्वागत गीत
- संघ व एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षांची भाषणे
- प्रमुख पाहुण्यांचे मनोगत
- विशेष सत्कार : श्री. अक्षय प्रद्योत बोरकर
  'झी युवा सन्मान' सोहळ्यातील उद्योजक पुरस्काराचे मानकरी
  (तपशील पृ. ५)

◆◆◆ मध्यंतर ◆◆◆

- विवाहाची सुवर्णजयंती ओलांडणाऱ्या जोडप्यांचा व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा सत्कार.
- एज्यु. सोसायटीतर्फे गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षिसे.

**स्नेह संमेलनासाठी वेगळे निमंत्रण पाठविले जाणार नाही.**
**याची कृपया नोंद घ्यावी.**

**मारुती वि. दळवी**
कार्याध्यक्ष – संघ

**देवदास अ. नाडकर्णी**
कार्याध्यक्ष – एज्युकेशन सोसायटी

# संपादकीय

## स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे डॉ. विवेक श्रीपाद बोरकर

समोरील पृष्ठावर ज्ञातीच्या वार्षिक स्नेहसंमेलनाची निमंत्रण पत्रिका छापलेली आहे. या स्नेह संमेलनाचे प्रमुख पाहुणे आहेत आंतरराष्ट्रीय ख्यातीचे विद्वान प्राध्यापक डॉ. विवेक श्रीपाद बोरकर. १९९२ साली वयाच्या अवघ्या ३८ व्या वर्षी त्यांना विज्ञान जगतात समजला जाणारा शांतीस्वरुप भटनागर पुरस्कार मिळाला होता. त्यावेळी ते बंगळूर येथे इंडियन इन्स्टीट्युट ऑफ सायन्स या जगद्‌विख्यात संशोधन संस्थेत प्राध्यापक होते. याचा तपशील मुखपत्रिकेच्या एप्रिल १९९३ च्या अंकात दिला होता.

६५ वर्षाचे डॉ. बोरकर १९७० साली किंग जॉर्ज हायस्कूलमधून शालांत परीक्षेंत बोर्डातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले होते. त्यानंतर आय.आय.टी पवई येथून इलेक्ट्रीकल इंजिनीयरींगमध्ये पदवी घेतल्यावर अमेरिकेत जाऊन त्यांनी पदव्युत्तर शिक्षण घेतले व नंतर युनिव्हर्सिटी ऑफ कॉलिफोर्निया, बर्कले या अत्यंत नावाजलेल्या विद्यापीठातून त्यांना डॉक्टरेट मिळाली. त्यांनी अध्यापन व संशोधन हे क्षेत्र निवडले. अमेरिकेतील गलेगठ्ठ पगाराच्या आमिषाकडे पाठ फिरवून ते भारतात परतले. प्रथम त्यांनी TIFR च्या बंगळूर शाखेत फेलो म्हणून काम केले. नंतर बंगळूर येथेच इंडियन इन्स्टीट्युट ऑफ सायन्स येथे दहा वर्षे संशोधन व अध्यापन केले. २०११ पासून ते पवईच्या आय.आय.टी. येथे इलेक्ट्रीकल इंजीनियरींग या विभागात चेअर प्रोफेसर या प्रतिष्ठित पदावर कार्यरत आहेत. डॉ. बोरकर यांच्या संशोधनाचा आलेख सतत वाढतच राहिलेला आहे. आय. आय. टी पवई शिवाय एम्.आय.टी., युनिव्हर्सिटी ऑफ मेरीलॅण्ड, युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया इत्यादी जगभरच्या मातब्बर विद्यापीठात ते अध्यापन करतात. त्याशिवाय जगभर ठिकठिकाणी कार्यशाळा, चर्चासत्र यात भाग घेण्यासाठी त्यांची सतत भ्रमंती असते. आतापर्यंत अशा दोनशेहून अधिक सत्रांत त्यांनी भाग घेतला आहे. यावरुनच त्यांच्या प्रचंड व्यापाची कल्पना येते.

डॉ. बोरकर यांनी लिहिलेल्या शोध निबंधाची गणतीच नाही. त्यांच्या नांवे सुमारे १८५ शोध निबंध आहेत. त्यांना आतापर्यंत अनेक पुरस्कार व मानसन्मान मिळाले आहेत. त्यांची यादी येथे जागे अभावी देणे शक्य नाही. त्याशिवाय अनेक संशोधनसंस्थानी त्यांना फेलो म्हणून सन्मानित केले आहे.

बाहेर कितीही पुरस्कार मिळाले तरी घरांतली 'शाबास रे पुता' ही मायेची थाप जास्त मौलिक असते. १९९५ साली संघाच्या हीरक महोत्सवाच्या वर्षी संघाने त्यांना सन्माननीय सभासद म्हणून स्वीकृत केले व वार्षिक स्नेहसंमेलनांत प्रमुख पाहुणे पद्मभूषण डॉ. पद्माकर दुभाषी यांच्या हस्ते त्यांचे जाहीर कौतुक होणार होते. पण ते उपस्थित राहू शकले नाहीत.

डॉ. बोरकर आता निवृत्तीच्या समीप आलेले आहेत. पण निवृत्तीनंतरही ते आपल्या ज्ञानाचा उपयोग इतरांना देतील अशी सदिच्छा.

द. गो. नाडकर्णी

# के.जी.एस. को-ऑप.हौ.सोसायटी

सरस्वती बाग, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-६०.

## शतकपूर्ती सोहळा.... के. जी. एस. सोसायटीचा

१५ जूलै १९१८ साली नामांकीत सारस्वत मंडळींनी एकत्र येऊन एका सहकारी वसाहतीची स्थापना केली. कॅनरा गौड सारस्वत ब्राम्हणांनी स्थापन केलेली ही वसाहत म्हणजे सरस्वती बाग, जोगेश्वरी पूर्वेकडील जणू **"मीनी कारवारच"** १५ जूलै २०१९ रोजी श्री सत्यनारायणाची पुजा थाटून या शतकपूर्ती सोहळ्याची सुरवात केली व त्याच रात्री सरस्वती बागेतील ९५ वर्षे पुरातन श्री रामेश्वर मंदिरात रंगपूजा बांधुन या शतकपूर्ती सोहळ्याच्या सुरवातीसच श्री रामेश्वराचे आशिर्वाद घेतले.

यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे विषेश करमणूकीचे व स्पर्धात्मक कार्यक्रम जूलैमध्ये न करता डिसेंबर मध्ये करण्याचे ठरले. दि. २१ डिसेंबर २०१९ ते २५ डिसेंबर २०१९ या कालावधीत या शतकपूर्ती सोहळाची सांगता करण्याचे ठरले आहे. या कार्यक्रमांचा थोडक्यात घोशवारा खालील प्रमाणे.

**१) शनिवार दिनांक २१ डिसेंबर २०१९ रोजी सायं. ७.०० वाजता - शतकपूर्ती सोहळ्याचे दिमाखदार उद्घाटन**

ज्ञातीतील सुप्रसिध्द व्यक्तींच्या हस्ते सोहळ्याचे भव्य उद्घाटन आणि तद्नंतर सोसायटीतील कलाकारांनी सादर केलेला सुगम संगतीताचा कार्यक्रम **"शतदा प्रेम करावे......"** सादरकर्ते - **सुर सरस्वती प्रतिष्ठान**

**२) रविवार दिनांक २२ डिसेंबर २०१९ - स्पर्धांचा दिवस**

सकाळी १०.०० वा. थोरामोठ्यांसाठी विविध करमणूक प्रधान मैदानी स्पर्धांचे आयोजन केले आहे. चमचा गोठी, बटाटा शर्यत, सुईत दोरा घालणे इत्यादी

तसेच सायंकाळी ७ वाजता टॅलेंट स्पर्धा, फॅन्सीड्रेस स्पर्धा, अंताक्षरी स्पर्धा.... वेगवेगळ्या वयोगटासाठी घेण्याचा मानस आहे. ज्यामुळे करमणूक पण साध्य होईल आणि रहिवाशी बंधू-भगिनींच्या आंगच्या कलागुणांना वाव दिल्याचे मानसीक समाधान सुध्दा लाभेल.

**३) सोमवार दिनांक २३ डिसेंबर २०१९ रोजी सायं ७ वाजता - "तीन एकांकिका"**

सोसायटीतील वनिता वृंदाने सादर केलेली - एकांकिका

सोसायटीतील तरुण मंडळींनी सादर केलेली विनोदी एकांकिका

सोसायटीतील बालबच्चे मंडळींनी सादर केलेली एकांकिका पु. ल. देशपांडे लिखित **वयंम् मोठम् खोटम्**

**४) मंगळवार दिनांक २४ डिसेंबर २०१९ रोजी सायंकाळी ७ वाजता - नाट्यशास्त्र विनोदेन !**

हे वर्ष पुल देशपांडे या थोर नाटककाराचे सुध्दा जन्मशताब्दी वर्ष आहे व योगायोगाने ते आपल्या बालवयात याच आमच्या सोसायटीत वस्तीला होते. त्यांना आदरांजली वहावी यानिमित्ताने त्यांचेच तीन अंकी नाटक "........???" सोसायटीतील कलाकार मंडळींना घेऊन "सारस्वत अॅमॅच्युअर्स" या संस्थेच्या सहयोगाने सादर करण्यात येईल.

**५) बुधवार दिनांक २५ डिसेंबर २०१९ रोजी सायंकाळी ६ वाजता - "आनंद मेळा"**

या आनंद मेळात विविध खाद्य पदार्थांचे (अर्थात कारवारी चवीचे) स्टॉल्स असतील व त्यातील उत्कृष्ट खाद्य पदार्थास परितोषिकाने, सन्मानीत करण्यात येईल. तसेच स्टॉल सजावटीसाठी सुध्दा पारितोषिक असेल.

त्याचप्रमाणे तरुणांसाठी फॅशन परेड (स्पर्धा) आणि वयोमर्यादा शिथिल करुन इतरांसाठी भारतीय पोशाख परिधान स्पर्धा आयोजित करण्यात येईल.

अशा प्रकारच्या विविध करमणूकीने शतकपूर्ती सोहळ्याची सांगता होईल.

**तेव्हा आपण सर्वांनी जरुर यायच आणि १०० वर्षाची आपली संस्कृती अनुभवायची बरं का?**

**शतक महोत्सव समिती**

# प्रकाश झोत

## प्रशिक्षक सुलक्षण कुलकर्णी यांच्या नेतृत्त्वाखालील भारताच्या अपंग क्रिकेट संघाला विश्वविजेतेपद

गेल्या ऑगस्ट महिन्यांत इंग्लंडमधील वूर्स्टर येथे सहा संघ सामील असलेल्या अपंग क्रिकेट स्पर्धेत भारताला अजिंक्यपद मिळाले. १३ ऑगस्टला झालेल्या टी २० अंतिम सामन्यांत भारताने इंग्लंड संघाला ३६ धावांनी पराभूत केले. या उज्ज्वल यशाचे शिल्पकार होते ५२ वर्षांचे मूळ भैरे गावाचे सुलक्षण कुलकर्णी. सात आठ वर्षापूर्वी मुंबईने रणजी करंडक स्पर्धेचे विजेतेपद मिळविले होते. तेव्हांही ते मुंबई संघाचे प्रशिक्षक होते. विदर्भाच्या रणजी टीमचेही ते कांही वर्षे प्रशिक्षक होते. मुंबईच्या खेळातील 'खडूस' वृत्तीचे त्यांनी त्यांना धडे दिले होते. त्याचा फायदा विदर्भाच्या खेळाडूंना झाला व गेली दोन वर्षे विदर्भाचा संघ रणजी करंडक स्पर्धेचा विजेता आहे. सुलक्षण कुलकर्णी स्वत: मुंबई संघातर्फे १९८५ ते २००२ दरम्यान क्रिकेट खेळलेले आहेत.

## 'कर्मयोगी'
## सौ. मीरा तेलंग प्रभू वेर्लेकर यांचे चौथे पुस्तक

गेल्या पिढीतील कारवारचे एक प्रतिष्ठित नागरीक रा. ब. गणपतराव तेलंग यांची नात सौ. मीरा तेलंग प्रभू वेर्लेकर या म्हापसा येथे स्थायिक झाल्या आहेत. ललितलेखनांत त्यांना विशेष रस असला तरी व्यक्तिचित्रे आणि वैचारिक लेखही त्या प्रभावीपणे लिहितात. अनेक लेख स्पर्धामध्ये त्यांनी बक्षिसे पटकावली आहेत. २००९ वर्षाच्या 'गोमंत विद्या निकेतन' या प्रतिष्ठित संस्थेच्या साहित्य पुरस्काराच्या त्या मानकरी आहेत. 'रंग उगवतीचे', 'दीपकळ्या' आणि 'आठवणीच्या पारावर' असे त्यांचे तीन ललित लेख संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. अलीकडेच 'कर्मयोगी' हे त्यांचे चौथे व्यक्तिचित्र संग्रहाचे पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. हे पुस्तक त्यांनी आपले कारवारप्रेमी वडील बंधू श्री. उदय तेलंग यांना प्रेमपूर्वक अर्पण केले आहे. या पुस्तकांत लेखिकेने त्यांच्यावर आयुष्यात ज्यांचे संस्कार झाले आहेत अशा सहा व्यक्तींची चरित्रे आहेत. या सहा व्यक्ती म्हणजे त्यांचे आजोबा रा.ब. गणपतराव तेलंग, वडील श्री. शंकर तेलंग, सिद्धहस्त लेखक श्री. रवीन्द्र पिंगे, व्यासंगी लेखक पद्मश्री सुरेश आमोणकर, हाडाचे शिक्षक श्री. रामदास फेणे व मांगल्यामाता श्रीमती मंगला वागळे. या पुस्तकाला गोवा मराठी अकादमीचे आर्थिक सहकार्य लाभले आहे यावरुन या पुस्तकांतील लिखाणाचा उच्च दर्जा समजतो.

## 'झी युवा' वाहिनीतर्फे श्री. अक्षय बोरकर यांना २०१९ सालचा सर्वोत्कृष्ट नवोदित उद्योजक पुरस्कार

श्री. भवानीशंकर ऊर्फ राया बोरकर यांचा वान्द्रे येथील कर्तबगार नातू श्री. अक्षय प्रद्योत बोरकर यांनी ऊर्जा निर्माण क्षेत्रांत नेत्रदीपक यश मिळविले आहे. ते 7 Green Solar System Pvt. Ltd. या कंपनीचे संस्थापक व कार्यकारी संचालक आहेत. सूर्यप्रकाशावरुन

ऊर्जा निर्माण करणाऱ्या 20 MW पेक्षाही जास्त क्षमतेचे प्रकल्प ते यशस्वीपणे उभारतात. त्यांच्यापाशी शंभरहून अधिक कुशल तंत्रज्ञ आहेत व कंपनीची उलाढाल पन्नास कोटीहून अधिक आहे. शेगांव संस्थान, टाटा स्टील, रेमण्डस, लार्सन अँड टोब्रो, डी. वाय. पाटील इन्स्टीट्युट इत्यादी नामांकित संस्थासाठी त्यांनी ऊर्जा प्रकल्प साकार केले आहेत. ओ. एन्. जी. सी. या प्रचंड उद्योगाच्या सामाजिक कार्याच्या जाणीवेतून त्यांनी सूर्यऊर्जेवर चालणारे पाच हजार रस्त्यावरचे दिवे लावले आहेत.

तरुण वयातल्या त्यांच्या असामान्य कर्तबगारीची दखल घेऊन 'झी युवा' वाहिनीतर्फे श्री. अक्षय बोरकर यांना यंदाचा सर्वोत्कृष्ट नवोदित उद्योजक म्हणून पुरस्कार मिळाला. १२ ऑक्टोबर रोजी वांद्रे येथील एका सभागृहात या पुरस्कारांचे वितरण झाले. याच वाहिनीवर १३ ऑक्टोबर रोजी त्याचे प्रक्षेपण झाले.

## श्री सलील नाडकर्णी व कुटुंबीयांची अमेरिका येथील कराटे स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी

पुणे येथील, सलील नाडकर्णी, सौ. शर्मिला नाडकर्णी व अतुल्य नाडकर्णी ह्या त्रयीने गॅटलीनबर्ग, टेनेसी, अमेरिका येथे २० जुलै २०१९ रोजी झालेल्या "इशिनरियू हॉल ऑफ फेम-२०१९" ह्या कराटे स्पर्धेत प्रत्येकी एक चषक जिंकले. ह्या स्पर्धेपूर्वी झालेल्या कार्यक्रमात, सलील नाडकर्णी ह्यांस "Sensei of Sensei" तर शर्मिला नाडकर्णी ह्यांना "Female instructor of the year" ह्या सन्मानाने गौरविण्यात आले.

सलील नाडकर्णी ह्यांनी ह्यापूर्वी १९९६ व २००३ मध्ये अमेरिका व २०००, २००५, २००७ मध्ये ऑस्ट्रेलिया येथे झालेल्या जागतिक कराटे स्पर्धांमध्ये एकूण ८ चषक जिंकले आहेत तर शर्मिला नाडकर्णी व अतुल्य नाडकर्णी ह्यांनी अनुक्रमे १९९७ मध्ये अमेरिका व २००० मध्ये ऑस्ट्रेलिया येथे झालेल्या जागतिक कराटे स्पर्धांमध्ये प्रत्येकी एक चषक जिंकले आहे.

सन २०१८ मध्ये सलील व शर्मिला नाडकर्णी ह्यांनी ओकिनावा, जपान मध्ये जागतिक कीर्तीच्या कराटे प्रशिक्षकांकडे प्रशिक्षण घेतले आहे.

सलील व शर्मिला नाडकर्णी गेल्या २९ वर्षापासून पुणे येथे "इशिनरियू कराटे व कोबूडो असोसिएशन ऑफ इंडिया" ही संस्था यशस्वीपणे चालवित आहेत.

शर्मिला नाडकर्णी ह्या मूळच्या कारवार येथील श्री. रामदास वासुदेवराव हळदीपूर ह्यांच्या ज्येष्ठ कन्या असून त्यांनी लग्नानंतर सलील नाडकर्णी ह्यांचेकडून कराटे प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली.

सलील नाडकर्णी ह्यांनी कारवार व सदाशिवगड येथील शालेय विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण दिले आहे. तसेच कारवार पोलीस हेडक्वार्टर्स मध्ये पोलीसांना "Advanced Combative Techniques" चे प्रशिक्षण दिले आहे.

"इशिषरियू हॉल ऑफ फेम - २०१९" स्पर्धेत सलील नाडकर्णी व शर्मिला

नाडकर्णी ह्यांनी प्रशिक्षण दिलेल्या १८ विद्यार्थी, विद्यार्थिनींनी एकूण २६ चषक जिंकले. सलील नाडकर्णी हे आठवा (८ वा) दान तर शर्मिला नाडकर्णी व अतुल्य नाडकर्णी हे ६ वा दान ब्लॅक बेल्ट धारक आहेत.

**कु. विजयनरसिंह नाडकर्णी याला ॲमिटी विद्यापीठाच्या B.Sc (Animation and Visual Graphics) या विषयांत सुवर्णपदक**

गेल्या पिढीत बहुतेकांना परिचित असलेले श्री. व्ही. टी. नाडकर्णी यांचा ठाणे येथे राहणारा पणतू कु. विजयनरसिंह शिवानंद नाडकर्णी हा ॲमिटी विद्यापीठ, महाराष्ट्राच्या B.Sc (Animation and Visual Graphics) या परीक्षेंत पहिल्या वर्गात पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला त्याबद्दल त्याला विद्यापीठाचे सुवर्णपदक मिळाले. विजयनरसिंहचे अभिनंदन.

**श्रीमती नीलिमा नाडकर्णी यांना मुंबईतील ग्राहक पंचायतीच्या लेखन स्पर्धेत पुरस्कार**

ग्राहकांना उत्तम दर्जाचे, रास्त दरांनी सर्व प्रकारचे सामान वितरण करणारी संस्था म्हणजे 'मुंबई ग्राहक पंचायत'. आशियातील ही सर्वांत मोठी स्वयंसेवी ग्राहक संघटना गेली ४५ वर्षे कार्यरत आहे. त्यांच्यातर्फे पालघर, वसई, नाशिक, पनवेल, अंधेरी, पुणे इत्यादी ठिकाणी सतत ग्राहक पेठा भरविल्या जातात. त्यामुळे स्वयं रोजगार निर्मितीही होते. या संघटनेचे मासिक मुखपत्र 'ग्राहक' यांच्यातर्फे अलीकडे 'मी आणि मुंबई ग्राहक पंचायत' ही लेखन स्पर्धा आयोजित करण्यांत आली होती. या स्पर्धेत पहिला, दुसरा असा क्रम लावला गेला नाही पण उत्तम पाच स्पर्धक निवडले गेले. त्यांत माहीम येथील श्रीमती नीलिमा शशिकान्त नाडकर्णी यांचाही समावेश आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. 'मुंबई ग्राहक पंचायतीचा परिचय' हा त्यांचा लेख पुढे उद्धृत केला आहे.

**"मुंबई ग्राहक पंचायत "-एक परिचय**

'ग्राहक' हा केवळ तीन अक्षरांनी बनलेला एक लहानसा शब्द! पण त्याची कक्षा अत्यंत विस्तृत! अगदी साध्या शब्दात सांगायचे, तर 'ग्राहक' म्हणजे खरेदी करणारा आणि कोणताही माणूस 'ग्राहक' असल्याशिवाय राहूच शकत नाही. जीवनावश्यक असणाऱ्या डाळ, तांदूळ, भाज्या, वस्त्रप्रावरणे यांसारख्या वस्तूंपासून जीवन आरामदायी करणाऱ्या फ्रीज, एअर कंडिशनर, मिक्सर वगैरे वस्तूंपर्यंत, तसेच वाहनांपासून वस्तूंपर्यंत कशाचाही विचार केला, तर या सर्वांच्या खरेदीसाठी पुढे येऊन कमी-जास्त किंमतीप्रमाणे पैसे मोजतो, तो ग्राहक!

याशिवाय काही विशिष्ट सेवा असतात. उदाहरणार्थ विमा बँकिंगसारख्या अर्थविषयक, आरोग्यविषयक, शिक्षणविषयक वगैरे. या सेवांचा उपयोग करणाराही 'ग्राहक' या वर्गातच येतो.

जोपर्यंत खात्री दिल्याप्रमाणे मालाचा दर्जा असे, सेवेत त्रुटी नसे, तोपर्यंत प्रश्न उभा रहात नसे. पण जेव्हां मालात भेसळ, मापात पाप, किंमतीत लबाडी, सेवेत दोष, कमतरता असून साऱ्या व्यवहारात ग्राहकाची फसवणूक होत आहे, त्याच्यावर अन्याय होत आहे, हे

सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ दिसू लागले, तेव्हां 'या ग्प्रहकाला वाली कोण?' हा यक्षप्रश्न उभा राहिला. त्याची रास्त बाजू घेऊन त्याला योग्य न्याय मिळविण्यात कोण मार्ग दाखवील, आणि त्याच्यावरील अन्यायाचे निराकरण करील, अशी परिस्थिती निर्माण झाली अशा वेळी हा न्याय मिळणे, हा ग्राहकाचा हक्कच आहे, हे पाठपुरावा करुन दाखवून देण्यासाठी एक संघटना अस्तित्वात आली तीच आहे, "मुंबई ग्राहक पंचायत."

'एकत्र येण्याच्या सूत्रात' बांधलेली ही संघटना आपल्या लोकसत्ताक देशाचे प्रतिरुपच म्हणता येईल! कारण ज्याप्रमाणे आपले राष्ट्र 'लोकांचे, लोकांसाठी, लोकांनी' चालविलेले! तशीच ग्राहक पंचायत ही 'ग्राहकांची, ग्राहकांसाठी, ग्राहकांनी' चालविलेली संघटना आहे. लोकशाहीचे हे बीज रोवले, 'माननीय बिंदूमाधव जोशी, पां. वा. गाडगीळ, मधुकर मंत्री, गंगाधर गाडगीळ' वगैरे विचारवन्तांनी! जास्तीत जास्त लोकांना एकत्र आणण्यासाठी 'वितरण–व्यवस्थेचे' माध्यम हाताशी धरुन या सर्व धुरीणांनी 'मुंबई ग्राहक पंचायती'च्या कार्याचा शुभारंभ केला.

आजतागायत, दर महिन्याला आवश्यक व आरोग्यप्रद वस्तूंचे अत्यंत शिस्तबद्ध आखणीने, सभासदांसाठी वितरण होत असते. पंचायतीच्या 'खरेदी'समितीचे सभासद स्वत: परिश्रम घेऊन उत्पादकांशी थेट संपर्क साधून उत्तम मालाची निवड करतात. अत्यंत उत्तम, वाचनीय साहित्य ग्राहकांच्या हाती यावे, या हेतूने निवडक पुस्तकांचे वितरणही इतर वस्तूंबरोबर मधून मधून होत असते. 'ग्राहक तितुका मेळवावा', हा मंत्र जपत ठिकठिकाणी 'ग्राहक –पेठांचे आयोजन केले जाते. 'रास्त भाव, चोख माल' हे ब्रीद सर्व व्यवहारात पाळले जाते. कारण या सर्वांमागील तत्त्व आहे, 'ना नफा, ना तोटा!' एखाद्या व्यवहारात ग्राहकाला सदोष माल दिला गेला आहे, असे त्याने दाखवून दिले, तर त्याच्या वतीने न्यायालयीन लढाई लढून त्याला योग्य न्याय मिळवून देण्यातही ग्राहक पंचायत अग्रभागी असते.

अर्थात, केवळ खरेदी–विक्री एवढीच आपल्या कार्याला मर्यादा न ठेवता, समाजमनाला सदैव जागरूक ठेवत समाजहिताचे ब्रीदही ती पाळत आहे. ग्राहकांच्या हक्कांची जपणूक करता करताच कर्तव्याचे बोधामृत त्यांना पाजण्याचे महत्कार्यही ग्राहक पंचायत करते. –कचरा वर्गीकरण, जल है, तो कल है, जाहिरात मूल्यमापन अशा अनेक महत्त्वाच्या बाबींची आवश्यकता पटवून देते.

"राष्ट्रीय" स्तरावर संघटनेने Rera कायदा ग्राहकाभिमुख करुन महाराष्ट्राला लागू करण्यात महत्त्वाचा वाटा उचलला आहे.

'ॲडव्होकेट शिरीष देशपांडे' यांच्यासारख्या महनीय कार्यकर्त्यांनी तर पंचायतीतर्फे 'Global Online Disputes Resolution" हा क्रांतिकारी प्रस्ताव मांडून ग्राहक पंचायतीच्या कार्याची नोंद थेट आंतराराष्ट्रीय स्तरावरील Unctad व Consumers International यांना घेण्यास भाग पाडले आहे!

**नीलिमा शशिकान्त नाडकर्णी, माहीम**
**२४३०९५४४/ ९१६७७४५६२८**

## कारवारकरांचा लाडका नातू पु.ल . देशपांडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त वाचकांच्या दृढ आठवणी

**(मागील अंकानंतर)**

**३**

श्री. पु. ल. देशपांडे या महान व्यक्तीची माझी प्रत्यक्ष ओळख मरीन ड्राईव्हवर झाली. मी आमच्या जर्मन शेफर्ड कुत्र्याला घेऊन रोज सकाळी फिरायला मरीन ड्राईव्हवर जात असे. आमच्या कुत्र्याचं नांव केऑस (Chaos). एकदा मी केऑसला म्हटले “समा चलरे! ओगीच मुकार वतनाका–मजेबरोबर चल.”

काही क्षणांतच साक्षात पु.ल. माझ्यासमोर उभे होते. “अहो मी आयुष्यात प्रथमच कुत्र्याला आपल्या भाषेत सूचना दिलेल्या ऐकल्या! फार बरे वाटले! तुम्ही तुमच्या कुत्र्याशी, तेही एका जातीवंत जर्मन शेफर्डशी, चक्क कारवारी भाषेत बोलता? माझी अशी कल्पना होती की कुत्र्यांना फक्त इंग्रजीच समजते. संपूर्ण पुणे–मुंबईत, मी तरी कोणालाही कुत्र्याशी इंग्रजी शिवाय बोललेले ऐकले नाही.”

पु.ल. ना कोण ओळखत नाही! पण एवढा मोठा माणूस माझ्यासमोर प्रत्यक्ष उभा पाहून मी अगदी हरखून गेले होते. माझे एवढे भाग्य की पुलंनी स्वत:च आपला परिचय करून दिला. ही वास्तविकता मान्य करणेच कठीण होते. ते म्हणाले की NCPA ने त्यांना डायरेक्टर म्हणून एक सुरेख फ्लॅट नरीमन पॉईंटला असलेल्या NCPA च्याच इमारतीत दिला आहे. त्यानंतर बऱ्याच वेळा पु.लं.ची मरीन ड्राईव्हवर भेट झाली. दरवेळी ते केऑसशी मोठ्या आस्थेने चौकशी करीत. “कितेरे केऑस! कसो आसा! काल तू माका दिसलो ना”. केऑसशी ते नेहमी शुद्ध कारवारी कोकणीतच चर्चा करत. माझ्याशी मात्र का कोण जाणे फक्त मराठीतच बोलत. वरील प्रसंगाचा त्यांनी आपल्या एका लेखांतही उल्लेख केला आहे. पुलंच्या उपस्थितीत संपूर्ण मरीन ड्राईव्हच पुलकित झाले होते.

एकदा पुलंचे एकपात्री नाटक–बटाट्याची चाळ पाहण्यास, आम्ही बिर्ला मातोश्री सभागृहामध्ये गेलो होतो. अगदी पुल स्टेजवर जेथे उभे राहतात त्यांच्या समोरच दुसऱ्या रांगेत आमच्या सीट्स होत्या.

नाटकातील विनोदी प्रसंगावर मी सवईप्रमाणे इतकी मोठ्याने खळखळून हसत होते की पु.ल. बोलायचे थांबून माझ्या दिशेने बघत व माझे हसणे थांबले की ते पुढे बोलायला सुरूवात करत. एका प्रसंगी तर मला हसणे आवरेचना. पु.ल. माईक सोडून पुढे आले व डोळ्यावर हात ठेवून, कोण इतक्या मोठ्याने हसून दाद देत आहे ते निरखून पाहू लागले. मला पाहताच लागलीच त्यांनी ओळखले व म्हणाले “तुम्ही हो मिसेस कसबेकर! मग बरोबर आहे! तुमचे नेहमी काहीतरी वेगळंच असते!”

एवढ्या मोठ्या माणसाने मला इतक्या खचाखच भरलेल्या सभागृहात ओळखले, हे पाहूनच मला अगदी गहिवरल्यासारखे झाले.

खरेच ! पुलसारख्या व्यक्तीने महाराष्ट्रात जन्म घेणे ही महाराष्ट्राचीच पुण्याई होय !

**सौ. मंगला (प्रभा) अरुण कसबेकर**

९८२०२१६४४१/८७७९९८६५५८

४

माझ्या आईची आई व पुलंच्या आईंची आई या माहेरच्या वाघ घराण्यातील चुलत बहिणी. कै. वामन मंगेश दुभाषी हे पु.लंचे आजोबा, एक माननीय विचारवंत. सर्वांशी प्रेमाने व सद्भावनेने वागणारे सद्गृहस्थ.

माझ्या आईला दुभाषी व त्यांच्या कुटुंबीयांबद्दल ओढ व आदर होता. त्यांना सुद्धा माझ्या आईबद्दल आपुलकी होती.

१९३८–४० च्या काळात आम्ही गिरगांवांत काँग्रेस हाऊस जवळील सीता चाळीत राहत असूं. दोन ते तीन महिन्यांत आमची पारल्यात एक फेरी असायची. शनिवारी दोन ते तीनच्या सुमारास निघून चार वाजण्याच्या दरम्यान आम्ही तेथे पोहोचूं. दुभाषी, त्यांच्या पत्नी, पुलंची आई व माझी आई यांच्या गप्पागोष्टी व्हायच्या. रविवारी जेवण झाल्यावर घरी परत.

माझी आई हार्मोनियम शिकत होती. एक मामा (कै. देवीदास शांताराम कसबेकर) तबला वाजवीत व धाकटे मोहन मामा साथ देत असत. पु.लं. ना गायनाची आवड. साधारण दोन ते तीन महिन्यांतून एकदा आमच्या घरी पुल, आमची आई, माझे मामा व माझे वडील यांची एक बैठक व्हायची.

मला अजूनही पु. लं.ची 'उघड दार – उघड दार' 'नभी उगवला सायंतारा' ही गाणी आठवतात. १९६४ साली आम्ही पारल्यांत राहायला आलो. दुभाषींचे घर आमच्या घरापासून पायी सुमारे पंधरा मिनिटावर. माझी आई अधून मधून त्यांच्याकडे जायची. तसेच पुलंची आई वेळोवेळी आमच्याकडे यायची. पुढे माझ्या धाकट्या भावाचे व बहिणींचे शिक्षण व नंतर नोकऱ्या यामुळे येणंजाणं कमी झालं.

माझी बहीण सेंट्रल बँकेत नोकरीला होती. साधारण १९६६–६७ च्या दरम्यान एका संस्थेस आर्थिक मदत करण्याच्या हेतूने पुलंनी मुंबई मराठी साहित्य संघ येथे 'बटाट्याची चाळ' हा प्रयोग केला होता. माझ्या बहिणीने तीन तिकीटे विकत घेतली. माझे आईवडील व बहीण त्या प्रयोगाला गेली. त्यांच्या सीट्स साधारण पुढच्या रांगेत होत्या. प्रयोग संपला व माझे आई वडील व बहीण हळूहळू बाहेर यायला लागली. तेवढ्यात संघाचा एक शिपाई आईकडे बघत बघत पुढे आला व आईला म्हणाला देशपांडे साहेबांनी आपल्यास थांबायला सांगितले

आहे. त्यांना तुम्हाला भेटायचे आहे. माझे आई वडील व बहीण बाजूला थांबली. थोड्यांच वेळांत पुल स्टेजवरून उतरुन आले व माझ्या आईला म्हणाले. 'काय ग मुक्ता कशी आहेस ?' व माझ्या वडिलांना 'दत्ताभावोजी आपण कसें आहांत' असे विचारले. माझ्या आईचा आनंद गगनात मावेना. काही जुन्या आठवणी व गप्पा झाल्या व पु.ल. परत गेले.

पुल गेल्यावर माझ्या बहिणीने त्या शिपायाला विचारले की देशपांडे साहेबानी आम्हांला थांबायला सांगितले ते तुम्हांस कसे कळले. त्यावर तो शिपाई म्हणाला इंटरव्हलच्या वेळी त्यांनी मला बोलावले व ते मला म्हणाले 'पाचव्या किंवा सहाव्या ओळीत एक कोट घातलेले गृहस्थ त्यांच्याबरोबर नऊवारी साडी नेसलेली त्यांची बायको व सहा वारी नेसलेली त्यांची मुलगी अशी तिघंजण आहेत. त्यांना प्रयोग संपल्यावर थांबायला सांग मला त्यांना भेटायचं आहे. म्हणून मी ताडले.' माझ्या आईला व बहिणीला आनंदाचा झटकाच बसला.

आई म्हणाली चर्नीरोड ते विलेपारले हे अंतर कधी गाठले ते कळलेच नाही.

**श्रीकांत दत्तात्रय वाघ, पारले**

(२६१२१३९१)

## २०१९ - २०२२ कालावधीसाठी नव्या कार्यकारिणी

### एन्. के. जी. एस्. बी. संघ

**कार्याध्यक्ष** : मारुती वि. दळवी — **कार्योपाध्यक्ष** : शिरीष दि. वाघ

**कार्यवाह** : मंगेश भा. पालेकर व वामन मं. नाडकर्णी

**खजिनदार** : राजीव दि. गायतोंडे व उदय म. नाडकर्णी

**सभासद** : देवदास अ. नाडकर्णी, प्रसाद म. हिचकड (स्वीकृत)

### ठाणे मंच

**कार्याध्यक्ष** : मारुती वि. दळवी — **कार्योपाध्यक्ष** : सुरेश मं. पालेकर

**कार्यवाह** : अरुण म. वाघ — **खजिनदार** : गिरीश मु. रेगे

**सभासद** : दुर्गादास शं. रेगे, अभिलाषा अ. रेगे, ज्योती कि. सुखटणकर, आनंद म. वागळे, राजेश वि. दिवेकर

### मुंबई मंच

**कार्याध्यक्ष** : मारुती वि. दळवी — **कार्योपाध्यक्ष** : शैलेश मं. गायतोंडे

**कार्यवाह** : प्रसाद दु. गायतोंडे — **खजिनदार** : विवेक सु. कुलकर्णी

**सभासद** : उदय गो. कसबेकर, राजीव ना. बोरकर, रसिका शै. गायतोंडे, मिहीर र. तेलंग

# पु.लं.च्या जन्मशताब्दी निमित्त
# पुलंपर्यंत नेणारा आठवणींचा पूल

बेळगावचा जन्मवीर, मुंबईचा कर्मवीर आणि कारवारचा प्रेमवीर असं ज्यांना म्हणता येईल ते पु. ल. देशपांडे अख्ख्या महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्त्व बनून राहिलं. शाळकरी वयात त्यांचं गणगोत वाचल्यानंतर मी त्यांची चाहती झाले. नतर त्यांची इतर काही पुस्तकेही वाचली आणि मी (मनाने) त्यांच्याजवळ गेले. प्रत्यक्ष न भेटताही माणसं खेचून घेण्याची जबरदस्त शक्ती त्यांच्या दर्जेदार लेखांमध्ये होती हे निर्विवाद सत्य आहे अशा या पुलंची भेट सोडाच, साधं लांबून तरी कधी दर्शन घडेल याची संधी मी शोधत होते. तसं त्यांच्या गुळाचा गणपती किंवा सह्याद्रीच्या पाऊलखुणामधून अभिनय, व्याख्यान, पेटीवादन वगैरे पाहता, ऐकता आलं. परंतु त्यांना प्रत्यक्ष पाहण्याची आस धडपडतच राहिली. एका कार्यक्रमासाठी निमंत्रित असताना गुडघेदुखीने त्रस्त असूनही ते पणजीला आले होते. ती त्यांची अखेरची गोवा भेट ठरली आणि मी त्यांच्या दर्शनाला कायमचीच मुकले. कै. रवींद्र पिंगे प्रथमच आमच्या घरी मुक्कामास आल्यावेळी त्यांनी पहिलाच प्रश्न मला टाकला होता. ‘तू पुलंना पाहिलंस?’ मी नाही म्हटल्यावर ते म्हणाले होते, ‘तर मग तू दुर्दैवी आहेस गं.’ त्यांनी मग मला मुंबईहून आपल्याकडील पुलंचा एक छानसा फोटो पाठवून दिला होता.

माझ्या माहेरी हिंदू स्कूलमध्ये शिकणारे पुलंच्या आजोबांचे हुशार विद्यार्थी काकासाहेब कालेकर यायचे. तसंच कै. अ. का. प्रियोळकर आणि गोव्याचे मनोहर हिरबा सरदेसाई यांच्यासारख्या श्रेष्ठ साहित्यिकांचा या ना त्या कारणाने आमच्या घरी मुक्काम असे. त्यावेळी मी जन्मलेसुद्धा नव्हते. त्यामुळे त्यांच्या भेटीचं एवढं वाटलं नाही, परंतु समकालीन असलेल्या आपल्या लाडक्या लेखकाला एकवारही न पाहिल्याची मनाला लागलेली हूरहूर आजतागायत आहे.

आम्ही लेखक वाचक या नात्याने एकमेकांना भेटलो नसलो, तरी ‘कारवार’ या गावाने मात्र मला त्यांच्या खूप जवळ नेलं. तसं तर माझं माहेर आणि त्यांचं आजोळ याच गावचं. त्यांनी आपल्या कितीतरी लेखांमधून माझ्या कारवारचं तोंडभरून केलेलं कौतुक वाचताना माझा ऊर अभिमानाने भरून गेला नसता तरच नवल! ‘गोमन्त भारती’ प्रकाशनाने १९६० साली प्रसिद्ध केलेल्या ‘स्वाती’ या निवडक कोकणी लेखसंग्रहातला ‘कारवार’ हा त्यांचा लेख माझ्या संग्रही आहे. अस्सल कारवारी कोकणीमध्ये लिहिलेला. त्यात ते लिहितात ‘ल्हानपणांत कोणेय विचाल्ले की तुगॅलेँ गाव खंचे रे, की हाव सांगतालो ‘कारवार’. कायद्यान पळौच्या गेल्यावर हाव कारवारचो न्हय पुण भावनेच्या नात्यन हाव कारवारचो. कारण मगेली अपुर्बाय केली ती

कारवारान. थय मगेल्यो आज्यो, आजे, मावश्यो, आशिल्ल्यो. कारवारची वेळ (समुद्र), सुरू पार्क, देवगडावयलो झकपक करता तो दिवो आणि काजुबागातल्यान दिसतालो तो सदाशिवगड हे सगळे मगेल्या रक्ताच्या नात्यातले लोक! आता कारवार उल्लां ते मगेल्या अंत:करणातल्या एका कॉनशात...'

अगदी मनापासून कारवारवर प्रेम करणारे आणि शाळा-कॉलेजला सुट्टी पडली की बालपणापासूनच अत्यंत ओढीने भद्रावती बोटीतून येथून कारवारकडे धाव घेणारे पुल म्हणूनच मला आपले वाटतात. कारवारबद्दल वाटणाऱ्या त्यांच्या माझ्या भावनांची जातकुळी एकच! त्यांना कारवारच्या निसर्गात, माणसांत जे जे दिसलं, सापडलं ते ते मी ही अनुभवलं... अगदी पंचवीस वर्षे!

त्यांनी स्वत:च लिहिलेल्या एकपात्री नाटकाचा पहिला प्रयोग केला तो सदाशिवगडलाच... गावकऱ्यांसमोर माणशी २ पैसे तिकिटाचा दर लावून. त्यातून जमलेल्या आठ आण्यातून मुंबयकराच्या हॉटेलमध्ये भुरकावलेली पातळ भाजी आणि गरम मसाल्याचे पोहे. सुरु पार्कातून पाहिलेला सूर्यास्त, कोडीबाग ते सदाशिवगडपर्यंत लॉँचमधून केलेला प्रवास, धक्क्यावरील रामाच्या हॉटेलमध्ये खाल्लेली भजी... ही सर्व मौज मजा मीही बालपणी त्याच जागांवर त्याच ठिकाणी अनुभवलेली आहे, ही जाणीव माझ्या अंगावर अक्षरश: रोमांच फुलवते.

परवाच मला मुंबईस्थित कारवारी लेखक विठ्ठल राय भट यांनी 'निसर्गाचं नयनरम्य लेणं कारवार' हे पुस्तक पाठवून दिलंय. त्यामध्ये पुलंच्या 'पुरचुंडी' या पुस्तकातून घेतलेला 'माझं बालपण जागवणारे सदाशिवगड' हा लेख आहे. त्यामध्ये त्यांच्यावेळच्या काही मास्तरांचा नामोल्लेख आहे. त्यापैकी गुंडामास्तर आणि नुनमास्तर यांना मी पाहिलेलं आहे. अर्थात पुलंनी बालवयात पाहिलेले तेव्हाचे ते तरुण मास्तर माझ्या बालपणात मी पाहीपर्यंत वृद्ध झालेले होते. गांधीजींप्रमाणे गुडघ्यापर्यंतच छोटसं धोतर नेसून, हातात काठी धरून अनवाणी पायाने हळूहळू चालणाऱ्या नुनामास्तरांना मी कितीतरी वेळा आमच्या फार्मसीच्या पायऱ्या चढताना हात दिलेला आहे. पुलंची आजी सदाशिवगडवरील वाघ घराण्यातली. गोव्याचे ज्येष्ठ पत्रकार कै. जगदीश वाघ हेही त्याच घराण्याचे. जगदीशभाईच्या आणि माझा परिचय गोव्यात 'कारवार' या ओळखीतूनच आला. सांगायचा मुद्दा अशा कोणत्याही नात्याच्या किंवा माणसाच्या माध्यमातून पुलंच्या जवळ पोचल्याचं वेडं भाबडं समाधान मी पामर मिळवते. या माझ्या भावनेला अधिक जवळ नेण्यास आणखी एक मजबूत धागा आहे. त्यांचे आजोबा वामन मंगेश दुभाषी यांनी कारवारला १८९७ साली स्थापन केलेल्या 'हिंदू स्कूल' या शाळेची संपूर्ण

धुरा सर्वप्रथम धीमण्णा आणि नुनामास्तर या बंधुद्वयांनंतर माझे आजोबा कै. रा. ब. तेलंग यांनी सलग पंधरा वर्षे अध्यक्षपदावर राहून सांभाळली. एकग्रामी असणं, पुलंच्या आजोबांच्या शाळेत शिक्षण घेणं, पुढे त्याच शाळेत विद्यादानाचं काम करणं... या गोष्टी पुलंना लांबूनच बघाव्या इतपत नव्हे, तर त्यांच्यासमोर जाऊन बसण्या इतपत (माझी तेवढी लायकी नसली तरीही) भक्कम नव्हत्या का ?

ते काही असो कारवारचा तोच निसर्ग, पुलंचा पदस्पर्श झालेल्या त्याच जागा तीच ठिकाणं आणि तीच माणसं त्यांच्या आठवणींचा पूल, पूर्णपणे 'पुल'कित झालेल्या मला थेट 'पुलं' पर्यंत नेऊन सोडतो. काय जादू भरलीय त्या आठवणींमध्ये ?

कै. रवींद्र पिंगे आणि विश्वचरित्र कोशकार कै. श्रीराम कामत (कविवर्य बाकिबाबांचे जावई) हे पुलंचे स्नेही होते. श्रीराम कामतांनी त्यांच्या उमेदवारीच्या काळात पुलंचे लेखनिक म्हणून काम केल्याचं त्यांच्याकडून मला कळलं. पर्वरीला त्यांच्या बंगल्यावर दोघांनीही पुलंचे किस्से मला ऐकवले होते. साक्षात पुलंचे स्नेही कालांतराने जेव्हा माझे गुरू, स्नेही बनतात तेव्हा एक बीजगणितीय सिद्धांत माझ्या दुखऱ्या मनावर फुंकर घालतो... जर अ = ब आणि ब = क असेल तर क = अ, हे ओघाने आलेच ना ? कसंही करुन पुलंशी मैलावरुन ही जवळीक साधण्याचा माझा हा प्रयत्न खुळाच म्हणा ना !

१२ जून २००० ला मराठी साहित्य विश्वातला सर्वांना हवाहवासा वाटणारा हा अष्टपैलू विनोदवीर हरवला. त्यादिवशी दूरदर्शनवरून त्यांच्या अखेरच्या दर्शनाचं प्रक्षेपण चालू होतं. छोट्या पडद्यावरचा त्यांचा निष्प्राण देह पाहून काळीज हेलावलं. मी चटकन सोफ्यावरून उठून डबडबल्या डोळ्यांनी पडद्यावरील त्यांच्या अचेतन चरणांना स्पर्श वेला आणि तो हात माझ्या मस्तकी टेकला...


**मीरा तेलंग प्रभूर्वेलेकर, म्हापसा**

(९४२०२४२३९६)



**SHREE HOMOEOPATHIC PHARMACY**

**Wholesale & Retail For :**

**Genuine Indian & Imported Homoeopathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Tel. : 2438 3092 / 2430 9035 Mob. : 98694 83433

Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) , Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**

## ऋणको ते धनको – एक अनोखा प्रवास (३)

मला पूर्ण खात्री आहे – आपले ज्ञातिबांधव, माझे लेख वाचून मनांत म्हणत असतील की **'हा अरुण कसबेकर थोडा अतीच देवीस्तुती करीत असतो. आम्ही असे म्हणत नाही की आमचा देवीवर विश्वास नाही ! पण आमच्या दृष्टीने कर्तृत्व जास्त महत्वाचे आहे. योग्य अभ्यास न करता केवळ देवीभक्तीने कुठल्याही स्पर्धेत यशस्वी होणे अशक्यच आहे.'**

मी सुद्धा पूर्णपणे त्यांच्याशी सहमत आहे. त्यांच्या या विचारांच्या पुष्टीकरिता मी माझे स्वत:चेच उदाहरण देऊ शकतो. शाळेंत असताना माझी हुशार मुलांमध्ये गणना होत असे. पण खरेच सांगतो जर मला हिंदू हायस्कूल मध्ये शिक्षणासाठी, आजी–आजोबांच्या देखरेखीखाली कारवारला पाठविले नसते तर माझे काय झाले असते याची कल्पनाच करवत नाही. आपले बहुतेक GSB बांधव कुशाग्रबुद्धीचेच असतात. मी सुद्धा होतो आणि अजूनही आहे असे वाटते. पण तोडीला मेहनत, कर्तृत्व, अभ्यास यांचा खूपच अभाव होता. १९५४ साली S.S.C. परीक्षा चालू असताना, शनिवारी Arithmatic चा पेपर होता व केवळ शिरीन टॉकीजमध्ये सुरु होणाऱ्या Quo Vadis सिनेमाची सुरुवात चुकू नये म्हणून मी परीक्षेचा हॉल, अर्धातास आधीच, उत्तरपत्रिका रिचेक न करताच सोडला व Quo Vadis संपूर्ण बघितला. S.S.C. त मार्क छान मिळाले पण अंकगणितात ८७ मिळाले. जर सिनेमा बघण्याच्या निमित्ताने लवकर बाहेर पडलो नसतो तर पूर्ण १०० मार्कस् हमखास मिळाले असते. किती ही बेफिकीर वृत्ती !

चांगली बुद्धीमत्ता असून सुद्धा मी M.Sc. होऊ शकलो नाही. मी सर्वांना सांगतो की परीक्षेच्या तीन महिने आधीच मला फार चांगली नोकरी मिळाली आणि ऐन परीक्षेच्यावेळी मी कलकत्याला होतो आणि हे सत्य कथन आहे. पण मी स्वत:लाच कसे फसवू शकतो ? कोणालाही स्वत:ला फसविणे शक्यच नाही. मी M.Sc. ची परीक्षा नंतरसुद्धा सहज देऊ शकलो असतो. पण सत्य परिस्थिती–हे साकारण्यात जी थोडीफार मेहनत लागते ती करायलासुद्धा माझ्याकडे वेळ नव्हता. कारण इतर फालतु गोष्टींतच मी जास्त गुंतलो होतो.

पण अश्या बेजबाबदार तरुणाची, आयुष्याची संपूर्ण वाटचाल, अत्यंत समाधानकारक आणि यशस्वी, केवळ दैवीसंकेतामुळेच होऊ शकली, असे मला वाटते व खाली दिलेल्या दोन उदाहरणावरुन तुम्हालाही ते पटेल याची मला खात्री आहे.

### देवीकृपेची अनुभूती (५)

पनवेल जवळ जवाहर कॉ–ऑप. इंडस्ट्रीयल इस्टेटमध्ये आमची अतुलीना केमिकल्स

(इंडिया) प्रा. लि. नावाने भव्य फॅक्टरी होती व तेथे आम्ही PNP या रासायनिक पदार्थाचे उत्पादन करीत होतो व आमचे संपूर्ण उत्पादन बायर इंडिया लिमिटेडला जात असे. आमच्या कारखान्यातील वेस्ट पाणी (effluent) सोसायटीने व्यवस्था केलेल्या सांडपाण्याच्या निचरा पाईपलाईनमधून रीतसर बाहेर जात असे. पण अचानक तेथील नगरपालिकेने सोसायटीला न कळविता तो मार्ग बदलला आणि सर्व वेस्ट पाणी शेजारच्या शेतांत गेले आणि शेतजमीन पिवळ्या रंगाची दिसू लागली. एके दिवशी जवळ जवळ ६०-७० लोक काठ्या, फावडी, पहारी आणि कोयते घेवून आमच्या फॅक्टरीत जबरदस्तीने घुसले आणि फॅक्टरीमधील सर्वांना, खास करुन मालकवर्गाला, जीवे मारण्याच्या धमक्या देऊ लागले. त्यावेळी मोबाईल फोन नव्हते व आमच्या फोनच्या लाईन्स त्यांनी कापून टाकल्या होत्या. फारच भितीदायक वातावरण होते. पाच सहा जणांनी मला खेचून बाहेर लोकांसमोर आणले. मी आई शांतादुर्गेची मूर्ती डोळ्यासमोर आणून तिची मनोमन आराधना करण्यापलीकडे काहीही करु शकलो नाही. पण अचानक माझ्या तोंडातून विश्वासपूर्ण काही शब्द बाहेर पडले.

'आमच्या वेस्ट पाण्याने तुमची सगळी शेते पिवळी पडली आहेत व तुमचे भयानक नुकसान झाले असे तुम्ही म्हणता पण समजा या पिवळ्या पाण्यामुळेच जर तुम्हाला नेहमीपेक्षा जर जास्ती पीक आले तर त्या जास्त आलेल्या पीकाचा अर्धा भाग तुम्ही आम्हाला द्याल का ?'

असे म्हणताच सगळे चवताळलेले अगदी बावचळून गेले ! त्यांना काय करावे हेच कळेना. चुपचाप सगळे निघून गेले. नंतर जवळ-जवळ तीन वर्षे कोणीही आमच्या बाजूला फिरकलेच नाहीत. आम्हाला ते टाळीत होते. वेस्टपाण्याचा मार्ग ही आम्ही बदलला होता. पण एकदा एक शेतकरी फॅक्टरीत आला आणि अगदी शेळपट आवाजात विचारु लागला की त्याला आमचे वेस्टपाणी टँकरमधून मिळू शकेल का ?

आमच्या PNP पासून बायर इंडिया, मिथाईल पॅराथिऑन नावाचे एक रसायन बनवीत होते. ते एक कीटकनाशक आहे हे मला नंतर कळले. आमच्या वेस्ट पाण्यात कीटकनाशकाचा अंश अर्थात असणारच आणि शेतकऱ्यांचा फायदाच होईल हा विचार देवीने माझ्या मुखातून योग्यवेळी वदविला.

**देवीकृपेची अनुभूती (६)**

सन २००७ माझ्या आयुष्यातले अविस्मरणीय वर्ष आहे. या वर्षातल्या घडामोडी एखाद्या परी कथेपेक्षा कमी नाहीत. आमची काहीही चूक नसताना केवळ केंद्र शासनाच्या एका अतिशय हलगर्जीपणाने घेतलेल्या निर्णयाने सर्व PNP बनविणाऱ्यांचे दिवाळे वाजले. परिणाम आम्हाला

बँक ऑफ इंडियाचे ५५ लाख रुपये देणे होते आणि मी आमची फॅक्टरी नाईलाजाने विकावयास काढली. माझी फॅक्टरीची जागा अगदी हायवे–टच आणि हॉटेल बनविण्यास अगदी योग्य होती. एका सिंधी गृहस्थाकडून मला केवळ रु. ६५ लाखाची ऑफर आली आणि मी तयार झालो. त्या गृहस्थाने सांगितले की, दुसऱ्या दिवशी त्याचे आई–वडील फॅक्टरी बघायला येतील आणि परवा आपण कायदेशीर व्यवहार करु. दुसऱ्या दिवशी त्याचे वयोवृद्ध वडील मला म्हणाले की मी त्यांच्या वयाला मान देऊन फॅक्टरीची किंमत रु. ५५ लाख करावी. त्याला मी अर्थातच नकार दिला व शेवटी कंटाळून मी रु. ६० लाखाला फॅक्टरी विकण्यास तयार झालो. त्या सिंधी गृहस्थाच्या आई–वडिलांनी मला सांगितले की त्यांची बाकीची दोन मुले फॅक्टरी बघायला उद्या येतील आणि परवा आपण सर्व व्यवहार कायदेशीररीत्या पूर्ण करु. दुसऱ्या दिवशी त्यांची इतर दोन मुले आली आणि मला म्हणाले–मि. कसबेकर तुम्ही आमच्या वडिलांना आणि दादांना अगदी XXX  बनविले. या फॅक्टरीला कोणीही रु. ५५ लाखापेक्षा एक पैसा जास्त देणार नाही. माझे डोके फिरले. मी त्यांना त्यांच्याच भाषेत सांगितले की दरवाजा चांगला उघडा आहे आणि मी तुम्हाला दोन मिनीटे देतो. तुम्ही ताबडतोब चालते व्हा! ही डिल रद्द केली जाते आहे!! दोन मिनीटांनतर मी स्वत:च तुमच्या XX वर लाथ मारुन तुम्हाला बाहेर काढीन. त्या सिंधी गृहस्थाने खूप गयावया केली पण मी मनातल्या मनांत देवीची शपथ घेतली होती की, मी बरबाद झालो तरी हरकत नाही पण या लोकांना मी कुठल्याही किंमतीला फॅक्टरी कदापि विकणार नाही.

मी देवीचे ध्यान केले आणि सर्व भवितव्य तिच्यावरच सोडले. मी फॅक्टरीबद्दल विचारच करणे बंद केले. तीन महिन्यांत केंद्र सरकारने घोषणा केली की नवी मुंबईमध्ये एअरपोर्ट होणार आहे व जागेचे भाव कडाडले.

अवघ्या चार महिन्यात, तीन शेट्टी नावांची माणसे माझ्या ऑफीसमध्ये आली आणि म्हणाले तुमची फॅक्टरी तुम्ही विकणार आहेत असे कळले. आम्हाला इंटरेस्ट आहे. मी माझ्यादृष्टीने खूपच जास्त किंमत सांगितली आणि आश्चर्य असे की ताबडतोब ती किंमत देण्यास ते तयार झाले.

या व्यवहाराने आमच्या आयुष्याचे गणित पूर्णपणे बदलले आणि आमचे असे प्रांजल मत आहे की हा असा प्रचंड चमत्कार फक्त आई शांतादुर्गेच्या कृपेनेच शक्य आहे.

माझ्या या निष्कर्षात काही चुकले आहे का ?

**अरुण भास्कर कसबेकर**
९८२०२९१३६५/८७७९९८६६०६
arunkasby@gmail.com

## कृतज्ञ व कृतघ्न

लहानपणी कृतज्ञ व कृतघ्न ह्या दोन शब्दांच्या उच्चारणांत व अर्थ समजण्यांत फार घोटाळा होत असे. पण जस-जसा जगाचा अनुभव आला तस-तसा कृतज्ञ म्हणजे केलेल्या उपकारांची /मदतीची जाणीव असणाऱ्या व कृतघ्न म्हणजे जाणीव नसणाऱ्या व्यक्ती. त्यांचा स्वभाव, वागणूक, बोलणं, हाव-भाव व अपेक्षा काय असतात ह्याची पूर्ण ओळख झाली.

मनुष्य एक सामाजिक प्राणी असल्याने त्याचा संबंध जगाशी, अगदी कुटुंब, नातेवाईक, मित्रपरिवार, ओळखी व अनोळखी लोकांशी सतत येत असतो व ह्या संबंधात त्यांची वरील सर्वांशी मदतीची देवाण-घेवाण नेहमी होत असते. मदतीचे मुख्य प्रकार असे आहेत.

१) **आर्थिक मदत (Financial Help)** : ही मदत कर्ज उधार वगैरे घेऊन आम्ही तिची परतफेड योग्य रीतीने जाणीव ठेऊन व मन:पूर्वक Thank you so much म्हणून कृतज्ञ होऊ शकतो अथवा मला मदत केली तर काय झाल ? मी पण व्याजा सकट सर्व चुकत केलं, संपलं अर्थात त्याची जाणीव न ठेवता कृतघ्न पण असु शकतो.

२) **बौद्धिक मदत (Intelectual Help)** : ही मदत शिक्षण संस्थातून, Coaching Classes वेगवेगळ्या Courses करुन (Formal) तसेच दुसऱ्यांचं पाहुन, त्यांच्या अनुभवातुन शिकून (Informal) आम्हाला सतत मिळते, पण Formal प्रकारांत फक्त फीस देऊन कृतज्ञ झाल्यास ती virtual कृतज्ञताच आहे. खऱ्या अर्थात कृतज्ञ तेव्हाच जेव्हा आपल्या लहान-लहान गोष्टींचा अडथळा दूर करून कोणी, कुठे व कसे आपल्याला शिकवले ह्याची जाणीव व उघड कबुली केली तरच कृतज्ञ व मी शहाणा म्हणुन सर्व शिकलो असं असल्यास कृतघ्न.

३) **शारीरीक मदत (Manual Help)** : ही मदत आपल्या अडीअडचणीच्या वेळी, दु:ख काळांत, आजारपणांत तसेच आनंदाच्या प्रसंगी व लग्नकार्यात उत्साहाने सहभागी होऊन आपुलकीच्या व प्रेमाच्या भावनेनी केली जाते. तिची परतफेड गिफ्ट वगैरे देऊन केल्यास virtual कृतज्ञता आहे पण त्याच आपुलकी, माया व उत्साहाने मदतगाराच्या सुख-दु:खांत सहभागी झाला तरच कृतज्ञता आहे व आपल्या अपेक्षे प्रमाणे नाही म्हणून केलेल्या मदतीत खोट काढुन कमी शोधल्यांस कृतघ्नताच आहे.

४) **भावनात्मक मदत (Emotional Help)** : वरील मदतीच्या सर्व प्रकारात ही मदत सर्वात श्रेष्ठ व उत्तम दर्जाची आहे, जी कृतज्ञ व कृतघ्न व्यक्तींची पूर्ण ओळख करवते. ह्या प्रकारच्या अंतर्गत आर्थिक साहाय्य तोंडातुन शब्द न काढता कष्ट व स्वत:चा वेळ देऊन, बौद्धिक साहाय्य

कसलीही अपेक्षा न ठेवता, हसत–खेळत आपल्या अनुभवांतून शिकवून केली जाते. हिची परतफेड फक्त भावनात्मक रीतीने करून आम्ही कृतज्ञ होऊ शकतो. ह्या विरूद्ध मदतगाराच्या विषयी चकाट्या पिटुन, त्याच्या गरजेच्या वेळी फक्त फोन व मॅसेज केल्यास ती कृतघ्नताच आहे.

लक्षांत ठेवा की तुमच्या संपर्कात आलेल्या कृतज्ञ/कृतघ्न व्यक्तीमध्ये फरक न करता माणुसकीच्या नात्याने जेवढी व ज्या प्रकारची मदत करता येईल ती अवश्य करा.

भावनात्मक मदत सर्वात श्रेष्ठ. ह्या करता कारण ह्याला लागणारं भांडवल मात्र प्रेम व निर्मल हृदय आहे जे आमच्या सर्वांकडे असतं पण जर अहं रूपी धूळ हृदयाच्या आरशावर चढलीतर भावनात्मक मदतीची देवाण–घेवाण बंद पडते व उरतो फक्त खार–दुश्वास. तसेच ह्या मदतीची विशेषता ही की ती कोणत्याही प्रकारच्या Radiations पेक्षा तीव्र गतीची असते व फक्त हृदयालाच समजता येते व ह्या करता Dont's म्हणजे गावातल्या गटारी न उपसणं, (पंचायती व दुसऱ्यांच्या जीवनांत नसती ताक–झाक) व Do's म्हणजे सर्वांशी प्रेमळ व गोड वागणं व बोलणं, गरजवंताचा फक्त हात हातात घेणं कांही न बोलतां फक्त डोळ्यांत पाहुन व स्पर्षातुन भावना व्यक्त करणं आहे. ह्या करता Art of living चा कोणता कोर्स न करता आम्हाला शांती, समाधान व जीवनाचा आनंद घरी बसल्या मिळेल व ईश्वरानी जे अमुल्य जीवन दिलं आहे त्या ईश्वरांस आम्ही कृतज्ञ होऊ शकतो. धन्यवाद!

**ज्योती दीपक तेलंग, बंगळूर**
(०८०–२३४६१४०७)

## विवाह /वाङ्‌निश्चय

| | | |
|---|---|---|
| मल्हार महेश आरस, पारले | व | रेणुका पै. गोवा |
| आमोदी रवीन्द्र बोरकर, अमेरिका | व | पिनाकीन प्रदीप धुमे, अमेरिका |
| मेगन माधव नाडकर्णी, अमेरिका | व | नाथन केन, अमेरिका |
| मंदार दत्तात्रय मुझुमदार, विरार | व | ऐश्वर्या विठ्ठल कामत, नेरुळ |
| तन्वी उमेश वागळे, पुणे | व | कार्तिक जयंत चौबळ, पुणे |
| श्रुती दिनेश वागळे, अंधेरी | व | सागर त्रिंबक सोमण, पुणे |

# MANGSIDESH INVESTMENTS PVT LTD

MSIPL

102, Business Point, Paliram Road, Off S.V.Road, Behind Brahma Kumari Hospital,
Andheri (West), Mumbai 400 058
Tel No. 022-4233 2323/ 6584 1233/ 6523 8964/ 98357 22444




Can we help you to achieve your goal???

& your goal is....

Let's reach nearer

To your highest GOAL!!!

Step by step....




*A little every month grows to something significant over time!!!*

*Invest Rs. 1000/- Per month & get...*

| Investment Years | Total Investment | Growth Rate 8% | Growth Rate 12% | Growth Rate 15% |
|---|---|---|---|---|
| 15 | 180,000 | 348,000 | 504,000 | 676,000 |
| 20 | 240,000 | 593,000 | 999,000 | 1,516,000 |
| 23 | 276,000 | 794,000 | 1,473,000 | 2,417,000 |
| 25 | 300,000 | 957,000 | 1,895,000 | 3,284,000 |
| 30 | 360,000 | 1,500,000 | 3,539,000 | 7,920,000 |
| 32 | 384,000 | 1,786,000 | 4,509,000 | 9,473,000 |
| 35 | 420,000 | 2,309,000 | 6,495,000 | 14,860,000 |




***Indian Equity market has given avege 16% return s in last 32 year s...***

Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully before investing.


# कारवारच्या इतिहासांतील एक संस्मरणीय घटना
# शेवटी मॅट्रीकचे केंद्र कारवारला सुरू झालं ...

माझ्या आठवणीप्रमाणे १९४० पर्यंत कारवारला मॅट्रीकचे केंद्र नव्हते. त्यामुळे मॅट्रीकचे विद्यार्थी ज्यांना आर्थिक दृष्ट्या शक्य होते ती मुलं मुंबई, बेळगाव, धारवाड याठिकाणी जाऊन परीक्षेस बसायची. ज्यांना हे शक्य नाही, ती मुलं मॅट्रीकपर्यंतच शिकायची. कारवारला मॅट्रीकचे केंद्र व्हावं म्हणून कारवारच्या जनतेनं खूप प्रयत्न केले. शेवटी ते साध्य झालं. मुंबई विद्यापीठाचे रजिस्ट्रार एस्. आर. डोंगरकेरी व आमचे कारवारचे के. जी. वर्टी अशा दिग्गजांनी मनावर घेऊन एक कमिटी स्थापन केली. त्यावेळी प्रश्नपत्रिका जागेवरच प्रिंट व्हायची. त्याच्या मूळ प्रती मुंबईहून कंडक्टरकडे यायच्या व त्या गावाच्या प्रेसमध्ये छापून परीक्षेला वाटप व्हायचं. चांगल्या प्रिंटींग प्रेसची व बसण्यासाठी हॉल यांची फार गरज होती. कारवारला एक छोटंसं प्रिंटींग प्रेस होतं व तिथे जाहिराती व लग्नपत्रिकेशिवाय कांही छापलं जात नव्हतं. प्रिंटींग प्रेसच्या आधुनिकीकरणाची गरज होती व ते साध्य झालं. हिंदू हायस्कूलनं आपल्या शाळेचे हॉल्स् परीक्षेसाठी दिले. शेवटी परीक्षा घेणे विद्यापीठाने मंजूर केले. ही एक मोठी संस्मरणीय घटना घडली.

१९४० च्या दरम्यान पहिल्या परीक्षेला सुरवात झाली. मूळ प्रश्नपत्रिका मुंबईहून कारवारला परीक्षा कंडक्टर घेऊन आले व परीक्षेच्या आदल्या रात्री पेपर्स छापण्याची तयारी झाली. पेपर छापण्याचं काम रात्री सुरु झालं. हे काम श्री. दिवेकर मास्तर (माझे बाबा) यांच्याकडे होतं. त्यांनी रात्री मुक्काम केला व पहाटे ४ वाजता मूळ प्रश्नपत्रिका सील काढून छापण्यास सुरवात केली व पेपर सकाळी ९ वाजेपर्यंत तयार झाले. ११ वाजता परीक्षेस सुरवात होणार होती. तोपर्यंत माझ्या बाबाना प्रेसमधून बाहेर जाता येत नव्हतं. कारण पोलीस बंदोबस्त होता. वेळेवर परीक्षा सुरु झाली. ३ दिवस चालली व व्यवस्थित पार पडली. हे आमच्या कारवारचे मोठे भाग्य! कारण गरीब मुलांनाही मॅट्रीक पर्यंत शिकता येत होतं.

माझे बाबा इतिहास व भुगोल या विषयांचे परीक्षक होते. त्यांच्याकडे ती जबाबदारी होती. परीक्षा संपल्यावर सर्व पेपर्स मुंबईस विद्यापीठाकडे जायचे. बाबा कारवारहून तिथे मुंबईस जायचे व ते पेपर्स ताब्यात घेऊन कारवारला यायचे. त्यानंतर १०-१५ दिवस तपासण्याच्या कामात व्यग्र असायचे. काम झाल्यावरही ते पेपर्स पॅक करुन पोस्टाने मुंबई विद्यापीठास पाठवून द्यायचे. असा दर वर्षीचा परीक्षेच्या काळातील दिनक्रम असे. पंधरा दिवस हा कार्यक्रम चालू असे. एकंदरीत सामान्य माणसाचे हाल कमी झाले. व याचा फायदा कारवार, अंकोला, कुमठा, होनावर, भटकळ या तालुक्यांच्या मुलांना झाला. व त्यांची चांगली सोय झाली.

**मोहन विश्वनाथ दिवेकर, पुणे**


www.kccgoa.in
कोमल हिरवी तृणपाती ही
अलगद झुलवी सर्वांग,
कोवळ्या सुवर्ण प्रकाशात
उजळून जाई आनंद
अप्रतिम निसर्गाने नटलेलं
सुखसमृद्धी
मंगेशाच्या देवळापासून 2 मिनिटांच्या अंतरावर,
मंगेशी, फोंडा- गोवा
फ्लॅटस् उपलब्ध: 1 रुम किचन, 1 बी.एच्.के, 2 बी.एच्.के
a Project by:
कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी
फॅक्स: 2683 3872 ई-मेल: kunalconstructiongoa@yahoo.in GOA RERA NO: PRGO05180314
गोवा ऑफिस: टी- 1, रॉयल हाऊस, काझीवाडो, फोंडा- गोवा. मोबा: 98209 33352, 98206 33321
गोवा साईट: 95/1, वेलिंग, मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा

## "ठाणे मंचचा वर्धापनदिन सोहळा"

'चैत्र', 'वैशाख', 'ज्येष्ठ' अशा या प्रत्येक मराठी महिन्यांचे त्यांचे त्यांचे एक स्वत:चे असे वैशिष्ट्य आहे. 'आषाढ' सरत आला की 'श्रावण' महिन्याचे वेध लागतात आणि याच महिन्यापासून सर्व व्रतवैकल्ये सणावारांची सुरुवात होत असते. अगदी सर्वजण या 'श्रावण' महिन्याची आतुरतेने वाट पहात असतात. आणि म्हणूनच या श्रावणमासाचा मान राखत ठाणे मंचचा वर्धापन दिन सोहळा रविवार दिनांक ११ ऑगस्ट २०१९ रोजी 'सुयोग हॉल' मुलुंड (पूर्व) येथे थाटामाटात साजरा करण्यात आला. पावसाने कृपा केल्यामुळे जवळजवळ १०० ज्ञातिबांधव हजर होते. त्यावेळी श्रावण महिन्यातील हळदीकुंकू व सत्यनारायणाची पूजा ठेवण्यात आली होती. सत्यनारायणाची पूजा श्री. अरुण व सौ. अभिलाषा रेगे (मुलुंड) यांच्या हस्ते संपन्न झाली. येणाऱ्या महिलांचे हॉलच्या प्रवेशद्वारापाशी हळदीकुंकू, चणे, गजरे देवून सुरेखा पालेकर, आशा रेगे व चित्रा वाघ यांनी स्वागत केले.

संध्याकाळी ठीक ६ वाजता कार्यक्रमास सुरुवात झाली. लता नायर यांनी सर्व रसिक प्रेक्षकांचे स्वागत केले. प्रथम आपल्या समाजातील जेष्ठ अतिथी श्री. महारुद्र व सौ. मंगला वागळे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन कार्यक्रमास सुरुवात झाली. श्री. सुरेश पालेकर यांनी या दांपत्याचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले या दांपत्याहस्ते सर्व कलाकारांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. श्री. प्रकाश तेलंग व सौ. जयश्री तेलंग यांनी रु. ५००१ ची देणगी ठाणे मंचला दिल्याचे जाहीर करण्यात आले व उपस्थितानी टाळ्या वाजवून कौतूक केले.

कार्यक्रमाची सुरुवात "गणेश वंदना" या नृत्याने झाली. हे नृत्य उर्विजा घुर्ये हिने तिच्या बहारदार अभिनयाने पेश केले. "तुज मागतो मी आता" हे हृदयनाथ मंगेशकर यांनी स्वरबद्ध केलेले भजन व "फुलले रे क्षण माझे" हे श्रीधर फडके यांनी स्वरबद्ध केलेले ही दोन गाणी करावकेवर प्रिया कुलकर्णी यांनी त्यांच्या सुमधुर आवाजात सादर केली. उर्विजा घुर्ये व मधुरा अथनीकर या दोघीनी "धर मुरे परदेशी" या गाण्यावर अप्रतिम नृत्य सादर करुन प्रेक्षकांना भारावून टाकले व टाळ्यांच्या गजरात वन्समोअरचा आग्रह केला. "काजल" चित्रपटातील "तोरा मन दर्पण कहलाये" हे आशा भोसले यांनी गायलेले व "या चिमण्यानो परत फिरा रे" हे भावगीत श्रीनिवास खळे यांनी स्वरबद्ध केलेली ही दोन गाणी ज्योती सुकथनकर यांनी गाऊन रसिकांची मने जिंकली. प्रसिद्ध आसामी कवी व गायक "भूपेन हजारिका" यांनी गायलेल्या गाण्यावर डॉ. कल्पना दिवेकर यांनी बहारदार नृत्य सादर करुन रसिक प्रेक्षकांची वाहवा मिळविली. सुवर्णा कुर्डीकर यांनी "प्रेमस्वरुप आई" हे भावगीत व "नको देवराया अंत आता पाहू" ही दोन गाणी गाऊन रसिकांना मंत्रमुग्ध केले. श्री. विजय वागळे यांनी अपराध चित्रपटातील "सूर तेची छेडिता" व देवबाप्पा चित्रपटातील "नाच रे

मोरा" ही गाणी शिट्टीवर वाजवून कार्यक्रमात बहार आणली. "देर लगी आने मे तुमको"ही "बिहाग" रागातील गजल व त्यानंतर कोकणी कार्यक्रमास एक कोकणी पद पहिजेच म्हणून "साद तुगेली आयकूक आयली" ही दोन गाणी लता नायर यांनी गाऊन प्रेक्षकांची दाद मिळविली. प्रसाद सावकर यांनी गायलेली दोन नाट्यगीते "जय गंगे भागिरथी" व "कानडा राजा पंढरीचा" रवी बोरकर यांनी गाऊन रसिकांना मंत्रमुग्ध करुन टाकले. किशोरकुमार यांनी गायलेली "कल आज कल" या चित्रपटातील "भवरे के गुंजन" व "मंझिल" चित्रपटातील "रिमझिम गिरे सावन" ही दोन गाणी अरुण रेगे यांनी करावकेवर गाऊन कार्यक्रमात रंगत आणली. जयश्री तेलंग यांनी माणिक वर्मा यांचे सुप्रसिद्ध गाणे "कौसल्येचा राम" व गजानन वाटवे यांनी गायलेले "मावळत्या नभ मंदिरातल्या तारांच्या दिपीका" ही गाणी त्यांच्या सुमधुर आवाजात पेश केली. प्रभात कुलकर्णी यांनी गदिमा लिखीत "इंद्रायणी काठी" व संत तुकाराम महाराजांचे अभंग 'जे का रंजले गांजले' हे दोन अभंग त्यांच्या सुरेल आवाजात पेश करुन रसिक प्रेक्षकांचे कान तृप्त केले. वरील गाण्यांना स्वरसाथ देणारे व तालबद्ध करणारे कलाकारही तेवढेच महत्त्वाचे त्यांना साथ देणारे हार्मोनियम वादक विद्याधर गोरे व तबला वादक अशोक सावंत आणि सर्व भजनामध्ये श्री. सुरेश वागळे यांनी टाळ वाजवून सुरेल साथ दिली.

निशीकांत नाडकर्णी यांनी "प्रणय कलह" या विषयावर नवराबायकोमधील कलह तीन वेगवेगळ्या प्रसंगात कथन करुन उपस्थितांचे मनोरंजन केले. आपली हिंदी गाणी एवढी समृद्ध आहेत की अगदी सोप्या रीतीने एका गाण्यातून दुसऱ्या गाण्यात शिरता येते अशी चौदा गाण्याची "मेडली" जी "यमन" रागावर आाधारित आहेत. ही गाणी सुचेता सोहोनी यांनी सादर केली व प्रेक्षकांनी ठेका धरुन त्यांना साथ दिली तसेच "बॉलीवुड डान्स" मोह मोहके धागे" व पद्मावती चित्रपटातील "घुमर" या दोन्ही गाण्याच्या मेलडीवर सुचेता सोहनी यांनी अप्रतिम डान्स करुन सर्वांची वाहवा मिळविली.

आपल्या आभार प्रदर्शन व समारोपाच्या भाषणात श्री. सुरेश पालेकर यांनी सांगितले की पुढच्या वर्षी म्हणजे ऑगस्ट २०२० ते ऑगस्ट २०२१ वर्ष हे "ठाणे मंच रौप्य महोत्सवी वर्ष " म्हणून साजरे करणार आहे. या वर्षभरात ठाणे, मुंबई, पुणे, येथे विविध कार्यक्रम करण्याचा मानस आहे. सर्व वयोगटासाठी "सुगम संगीत स्पर्धा" "नृत्य स्पर्धा" आयोजित केल्या जातील ज्ञातिबांधवानी त्यात जरुर भाग घ्यावा तसेच आपणास इतर काही कार्यक्रम सुचवायचे असल्यास कळवा आम्ही त्याचा जरुर विचार करु असे सांगून कार्यक्रमाची सांगता केली. सरतेशेवटी रुचकर भोजनाचा आस्वाद घेत मंडळी तृप्त मनाने मार्गस्थ झाली.

**सुषमा सुबोध मुळगांवकर**

९८१९८३६४७६

# मुंबई मंच - कारवारी मेळाव्याचे आमंत्रण

'कारवारी खाद्यमेळाव्याला'दरवर्षी मिळणाऱ्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे प्रेरणा घेऊन यंदाही एक 'आनंद मेळावा' भरविण्यात येत आहे. पाककृतीशिवाय ज्यांना आपण बनविलेल्या वस्तू किंवा पदार्थ विक्रीसाठी किंवा प्रदर्शनासाठी ठेवायचे असतील, व ज्यांना बालगोपाळासाठी करमणुकीचे खेळ आयोजित करावयाचे असतील त्यांनही गाळा मिळेल. इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा.



| | | |
|---|---|---|
| **तारीख व समय** | : | रविवार १९ जानेवारी २०२० |
| **कार्यस्थळ** | : | सरस्वती बाग, जोगेश्वरी,<br>के. जी. एस. सोसायटी पटांगण |
| **आकार** | : | रु. १००० एका गाळ्यासाठी |
| **संपर्क** | : | गाळा आरक्षणासाठी व पाककृती ठरविण्यासाठी |

**शैलेश गायतोंडे ९८६९२११०५५**
**(रात्रौ ७ ते १०)**

**राजू बोरकर ९८२०९१७८४१**
**(सकाळी १० ते १)**

**संपर्कासाठी अंतिम तारीख : ३१ डिसेंबर २०१९**

# REMEMBRANCE
# DR. MADHUKAR PIKLE
# 50TH DEATH ANNIVERSARY

For all the residents of Karwar 1st September 1969, will go down as one of the darkest days, as it was the day when they received the sad tidings of the untimely death of Dr. Madhukar Pikle at the young age of 42 leaving behind his wife Pushpamala and 4 young school going children Kunda (Mondkar), Vandana (Kekre), Ravi and Prasad who passed away recently.

This untimely death at the peak of his career left all of Karwar shell shocked. He was a very kind and generous soul who with hard work built his own Nursing Home. Patients in plenty would wait for hours to consult him as his diagnosis was accurate. He was appointed president of Karwar Municipality for two consecutive terms and was trustee of Arts and Science College and Mitra Samaj Karwar.

He was a workaholic and we his children used to look forward to being escorted by him for drives and Picnics which he would do despite his busy schedule. His demise cast a gloom in Karwar after his body was brought from Breach Candy Hospital, Mumbai and the funeral was attended by one and all.

50 years have passed since he expired but his memories still linger on.

**Kunda Mondkar**
**(23841375)**




**nkgsbmatrimony.com**

**Matrimonial Website**


**only for GSB / Saraswat Community**

**Enrol online and choose your life partner**

**CONTACT FOR DETAILS**

| | |
|---|---|
| **Shri Suresh Palekar** 8928850193 | **Shri Girish Rege** 9922168725 |


## MADHUKAR VINAYAK WAGLE



It is with deep regret we inform the sad demise of our father Madhukar V. Wagle in Pune on 20th August 2019 due to old age. He had an illustrious professional career in industry spanning over 35 years. He was a caring husband, a loving father and a great mentor to the youngsters in the family.

**We will miss you Baba - Vinay & Geeta**

## विलास विठ्ठल बोरकर - "एक सेवाभावी व श्रद्धाळू व्यक्तिमत्त्व"



दि. १२ सप्टेंबर रोजी 'अनंत चतुर्थी' च्या दिवशी विलासचे निधन झाले. कदाचित् त्याच्या सेवाभावी व श्रद्धाळू या गुणांमुळेच त्याला अशा चांगल्या दिवशी मरण आले. हा माझ्यापेक्षा २ वर्षांनी लहान, माझ्या पाठचा. "पाठचा तो पाठीराखा" या उक्तीप्रमाणेचं तो होता.

आमच्या जोगेश्वरीच्या सोसायटीत कोणाकडेही आनंदाचे किंवा दु:खाचे प्रसंग असोत, हा मदतीला हजर असायचा. कोणत्याही प्रकारची मदत करण्याची त्याची तयारी असे.

सरस्वती बाग, जोगेश्वरी येथील 'श्री रामेश्वर मंदीर' संस्थानचा थोडी थोडकी नव्हे तर २५ (पंचवीस) वर्षे तो ट्रस्टी (विश्वस्त) होता. व अगदी श्रद्धेने, निष्ठेने व प्रामाणिकपणे व चोख काम करत होता. देवाची पालखी असली की हा आधी हजर. पालखी उचलायलाही पुढे. पूर्ण पालखी फिरून झाल्यावर व आरती झाल्यावरच घरी जाऊन जेवायचा, कितीही वेळ (रात्र) झाली तरी. त्यावेळी पालखी फिरते ते रस्तेही दगडाने खडबडीत झालेले असायचे व पालखी बरोबरचे लोक अनवाणी पायानेच फिरत. देवळातल्या पेटीतील पैसे मोजायला तो माझ्या दोन्ही मुलांना घेऊन जात असे. त्यामुळे या दोघातही देवावर श्रद्धा व सेवाभावी वृत्ती हे संस्कार याच्यामुळेच रुजले. या त्याच्या कामगिरीमुळे सरस्वती बाग बहुतेक लोक त्याला ओळखत व त्याच्या निधनाचे वृत्त ऐकून तेही हळहळले.

आम्ही दोघे (तो व मी) बोलघेवडे. त्यामुळे मित्रपरिवारही खूप पण दैव गतीने शेवटचे काही महिने त्याचे बोलणे बंद झाले. आम्ही गेलो की प्रयत्न करूनही बोलता येत नाही म्हणून त्याचे डोळे अश्रुंनी भरायचे व ते बघून आमच्याही डोळ्यात पाणी यायचे. असो शेवटी 'ईश्वरेच्छा बलीयसी' म्हणायचे इतकेच.

त्याच्या आत्म्यास शांती मिळो हीच ईश्वरचरणी व श्री शांतादुर्गा चरणी प्रार्थना.

**सौ. सुहासिनी (बोरकर) वर्टी**
जोगेश्वरी (पूर्व)

।।ॐ।।

## विनया विजयानंद नाडकर्णी (हाणकोण)

## ।। प्रेमस्वरुप आई, वात्सल्यसिंधू आई।।



खरंच हे गाणे ऐकतांना आईची मूर्ती डोळ्यापुढे उभी राहते. हो, अशीच आई प्रेमाची, वात्सल्याची मूर्ती होती. सगळेच म्हणतात की देवाला सगळीकडे जाता येणे शक्य नसल्यामुळे त्याने आपले एक रूप या भूतलावर पाठविले आणि ते म्हणजे आमची आई.

आमची आई खरंच खूप मायेस्त, प्रेमळ, वात्सल्यांची होती आणि म्हणून कोण जाणे आजी आजोबांनी तिचं नांव 'प्रेमा' असं ठेवलं. तर आईचा विनयशीलपणा ओळखून आमच्या बाबांनी तिचं नाव 'विनया' ठेवलं आणि या दोन्ही नावांचे तिने सार्थक केले.

अशा आईच्या पोटी जन्माला येणं हे आम्ही दोघी भाग्याचे समजतो तर अशी बायको फक्त सातजन्मच नव्हेतर जन्मोजन्मी मिळावी अशी बाबांची ईशचरणी प्रार्थना आणि म्हणूनच म्हणावसं वाटतं की

**घे जन्म तू फिरोनी, येईन मीही पोटी।**
**खोटी ठरो न देवा, ही एक आस मोठी।।**


**प्रथमवर्ष स्मरणार्थ**

पती : श्री. विजयानंद महेश्वर नाडकर्णी

कन्या : १. कु. भावन वि. नाडकर्णी

२. सौ. अपर्णा सि. सावर्डेकर (अपर्णा वि. नाडकर्णी)

# A TRIBUTE TO BABA (SHANKAR ANNA) SHANKAR SADASHIV WAGLE (1902-1994)



A man who was loved by one and all. Whether a small child or the oldest in the room. A man who led a disciplined and wholesome life right till his last years. A man who woke up at 4 am without fail and would be ready for his morning walk at 5 am every single day, whether rain or sunshine. A man who was looked up to, for his sound advice and guidance by friends and relatives alike. A man who had a full circle of friends who would perennially drop by to see him, wish him and spend time in his joyful company. A man who was regularly reading and learning new things, whether homeopathy or yoga. He had the entire collection of Geeta, Mahabharat, Ramayana and Dnyaneshwari in his library. He would tell us to read the editorial columns in The Times of India to improve our English and learn a new English word every day. Forward-thinking and someone who saw what was right for us in the future, he gave us useful tips and advice. He was keen that his grandchildren studied a lot and excelled in whatever field they chose. He did the very best for all of us. As a grandfather, he knew when to be tough and when to let us loose.

He was a child at heart, and yet daring and courageous. As a young man, leaving behind the rustic life in a village in Karwar, Karnataka, he came to Mumbai to try his fortune in running a new business. He managed to set up a flourishing automobile business in Girgaum, Mumbai. But alas, life was not going to be that easy. In spite of life's ups and many downs, he always had his chin up and fought through adversity with positivity and grit. Always enthusiastic and cheerful with a song on his lips or drumming the table with his fingertips, he enjoyed a calm evening with classical Hindustani music playing in the background — a simple man with absolutely no vices. Though I must say, he had a sweet tooth!

He inspired us with his discipline, zestful energy, passion for life, loving

nature, curiosity to learn new things, sense of humour, ability to get things done, great mentoring, practical and positive nature, meticulous planning, and execution, always being available for his family - come what may. Above all, he wasa kind soul. He showed us that in spite of life's obstacles and many impediments, one can rise again like a Phoenix. You were the true rock star of your generation.

In spite of your small body frame you were like The Rain Tree - strong, solid, withstanding quietly all the rough weathers and providing shade and shelter unfailingly to your children and grand-children.

It’s been 25 years since you have left us, but it feels like you never really left us. Your beautiful memories are so strong and etched in our lives that we all remember you fondly for the great man you were to your family and friends. All those who know you, always utter your name, “Shankar Anna,” with a lot of respect, a big smile, and fond memories about you. You are and will always remain an idol to your grandchildren. If ever someone calls us “Chip of the old block”, it would indeed be a proud moment for your grandchildren!

**Satish Wagle, Aparna Telang,**
**Vaishali Phadnis, Priya Avasare,**
**Sheetal Rao, Shambhavi Wagle**

## विजूले चुटकुले

घोव बायल दिल्लीत फिरच्याक वतात. थंय ते हॉटेलांत राविल्ले तेन्ना तांगेले झगडे जाता. बायल रागान म्हणता हांव आत्तां या पांचव्या मजल्यावैल्यान खिडकीतल्यान उडी मार्न जीव दिता. घोव मॅनेजराक फोन कर्न आपयता आणि म्हणता मगेली बायल खिडकीतल्यान जीव दिवच्याक पळयता. मॅनेजर म्हणता तुमगेल्या झगडयांत हांव पडचो ना. घोव म्हणता अरे पिशा तुका कोणे मदी पडच्याक सांगला? ती खिडकी उघडना म्हण्ण तुका आपयले.

विजय सदानंद वागळे, ठाणे
९२२१६०७५७७

## निधन

| | | |
|---|---|---|
| प्रेमा दिनकर दळवी | (किन्नर) | दहीसर |
| श्रद्धा महेश देसाई | (व्हंड्डक्कल) | डोंबीवली |
| वसंत यशवंत दिवेकर | (कणसगिरी) | पुणे |
| विलास विठ्ठल बोरकर | (मल्लापूर) | अंधेरी |
| मेधा गौतम | | |
| (पूर्वाश्रमीच्या मेधा सदानंद नाडकर्णी) | (सांवरपै) | अमेरिका |
| सुधीर रघुनाथ कसबेकर | (कडवाड) | अंधेरी |
| हेमा प्रभाकर कसबेकर | (कडवाड) | फोंडा |
| विजया (सरु) नारायण कुलकर्णी | (खारगे) | वांद्रे |
| सुधा (सरोजिनी) रामचंद्र कुलकर्णी | (मुडगेरी) | ठाणे |
| नागेश मंगेश मुझुमदार | (अंकोला) | दादर |
| विनायक वासुदेव मुझुमदार | (अंकोला) | जोगेश्वरी |
| शुभांगी सुधीर मुझुमदार | (अंकोला) | डोंबीवली |
| कुमुद रामराव नाडकर्णी | (बसुणगे) | पणजी |
| दिलीप मनोहर नाडकर्णी | (मिर्जन) | वाशी |
| मंगला महाबळेश्वर नाडकर्णी | (सांवरपै) | अंधेरी |
| जयश्री कमलाकर पाळेकर | (पाळा, मुंडगोड) | चेंबूर |
| अलका अनिल फेणाणी | (चेंडीये) | ग्रांट रोड |
| सरला भालचंद्र रामाणी | (व्हडले बाग) | गोरेगांव |
| आशा (रमा) जयवंत तेलंग | (हळदीपूर) | घाटकोपर |
| स्मिता मधुकर तेलंग | (बाड) | ठाणे |
| विलास पांडुरंग वाघ | (सदाशिवगड) | माहीम |
| प्रतिभा शरद वाघ | (सदाशिवगड) | गांवदेवी |
| आशा (कावेरी) प्रेमानंद वाघ | (सदाशिवगड) | दांडेली |
| माधव सीताराम वागळे | (बाड) | हिंदू कॉलनी |
| आशा शंकर वागळे | (माजाळी) | वांद्रे |
| मधुकर (गोकुळ) विनायक वागळे | (माजाळी) | पुणे |
| वसंत वामन वागळे | (अस्नोटी) | पारले |
| श्रीपाद दत्तात्रय वर्टी | (सदाशिवगड) | बंगळूर |

## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

(मागील अंकानंतर)

उल्लेखनीय देणग्या

### श्री. विनायक पावशे यांच्या स्मरणार्थ एक लाख रुपयांची देणगी

आपल्या ज्ञातिबांधवांचे बाड येथील जुन्या पिढींतील पुरोहित पावशे कुटुंबीयांपैकी श्री. विनायक विष्णु पावशे यांचे बोरीवली येथे २०१० साली निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सुनंदा (हंसा) व पुत्र श्री. प्रशांत यांनी अलीकडेच वृद्धसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिली आहे.

### श्रीमती स्नेहलता (सिंधू) व श्री. मारुती सोहिरोबा तेलंग यांच्या स्मरणार्थ एक लाख रुपयांची देणगी

मुखपत्रिकेच्या जुलै २०१८ च्या अंकात श्री. अरुण कसबेकर यांनी त्यांची आतेबहीण यांच्यावर लिहिलेला 'माझी अष्टपैलू सिंधूताई' हा लेख प्रसिद्ध झाला होता. सिंधूताईचे सुपुत्र डॉ. गिरीश हे M.D. असून अनेस्थेटीस्ट म्हणून प्रॅक्टीस करतात. त्यांनी अलीकडचे आपली आई व वडील श्री. मारुती सोहिरोबा तेलंग यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वृद्धसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिली आहे.

### श्रीमती सुनीती मोहन वागळे यांच्या स्मरणार्थ पन्नास हजार रुपयांची देणगी

पूर्वी सचिवालसामध्ये काम करणारे श्री. मोहन शांताराम वागळे यांच्या पत्नी सुनीती यांचे अलीकडेच मे महिन्यांत दु:खद निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र श्री. धीरेन यांनी अलीकडेच समाजसेवा निधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

### श्रीमती सुशीला व श्री देवीदास कसबेकर यांच्या स्मरणार्थ पन्नास हजार रुपयांची देणगी

कारवारकरांची दादर येथील 'प्रगती' या सोसायटींत पूर्वी राहणारे श्रीमती सुशीला व श्री. देवीदास शांताराम कसबेकर यांची जेष्ठ कन्या श्रीमती आशा दार्नुले या अमेरिकेत स्थायिक झालेल्या आहेत. त्यांनी अलीकडेच आई वडीलांच्या स्मरणार्थ वृद्धसेवा निधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

### श्रीमती इंदू व श्री. गणपत सदाशिव वागळे यांच्या स्मरणार्थ साठ हजार रुपयांची देणगी

सरस्वती बाग, जोगेश्वरी येथील गेल्या पिढीतील एक कर्ते पुरुष श्री. गणपत सदाशिव वागळे ऊर्फ गणमाम यांचे पुत्र श्री. सदाशिव गणपत वागळे व त्यांच्या पत्नी श्रीमती इंदू (पूर्वाश्रमीच्या इंदू धोंड) हे जोगेश्वरी सोडून डोंबिवली येथे स्थायिक झाले होते. दोघांचेही बऱ्याच वर्षापूर्वी निधन झाले. उभयतांच्या स्मरणार्थ इंदूमामीचे भाचे श्री. बाळकृष्ण वासुदेव धोंड यांनी अलीकडेच साठ हजार रुपयांची देणगी दिली आहे. त्यांतील तीस हजार वृद्ध सेवा निधीसाठी आहेत व उर्वरीत तीस हजार एज्युकेशन सोसायटीसाठी आहेत.

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. मधुकर काशिनाथ नाडकर्णी यांच्या पुण्यतिथी निमित्त पत्नी श्रीमती शालन यांजकडून. | १,००१ |
| २. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या ८७ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून. | १,५०१ |
| ३. | श्रीमती सुनीती मोहन वागळे यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. धीरेन यांजकडून. | ५०,००१ |
| ४. | श्री. अभय शशिकांत वागळे यांजकडून. | ३,००० |
| ५. | वडिलांच्या पुण्यतिथीनिमित्त अनामिकाकडून. | १,००१ |
| ६. | श्री. रामदास काशिनाथ नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सिंधू यांजकडून. | १,५०० |
| ७. | पूर्वजांच्या स्मरणार्थ पितृपक्षानिमित्त अनामिकेकडून. | १,५०० |
| ८. | श्रीमती सुनीता देवीदास बोरकर यांजकडून आई श्रीमती वासंती यांच्या ७७ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी. | ५,००० |
| | वडील श्री. देवीदास पांडुरंग बोरकर यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ. | ५,००० |
| ९. | पितृपक्षाच्या प्रसंगी पूर्वजांच्या स्मरणार्थ भांडारकर कुटुंबीयांकडून | २,५०१ |
| १०. | श्री. अशोक काशिनाथ नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती शामल यांजकडून. | २,५०१ |

## वृद्धसेवा निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती उमाबाई विश्वंभर गायतोंडे यांच्या ३२ व्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. अरुणकुमार यांजकडून. | १०,००० |
| २. | श्री. जगदीश दिगंबर वाघ यांच्या दुसऱ्या पुण्यतिथीनिमित्त भाचा श्री. मांगिरीश प्रमोद कसबेकर, भाचे-सून श्रीमती उमा व नातू कुमार जय यांजकडून. | ५,००० |
| ३. | श्री. शरद सुब्राव तेलंग यांच्या ७६ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सुनीता व कन्या श्रीमती जया अतुल पार्टे व श्रीमती नूतन वैभव लोटलीकर यांजकडून. | १०,००० |
| ४. | श्री. त्रिंबक वैकुंठ कसबेकर यांच्या स्मरणार्थ नातू श्री. देवीदास विश्वंभर कसबेकर यांजकडून. | २१,००० |
| ५. | सविता सबनीस फाऊंडेशनतर्फे खालील व्यक्तींच्या स्मरणार्थ | |
| | श्रीमती स्नेहलता (चंपू) वासुदेव सबनीस. | ३,३३४ |
| | श्री. वासुदेव गजानन सबनीस. | ३,३३३ |
| | श्रीमती सविता किशोर सबनीस | ३,३३३ |

| | | |
|---|---|---|
| ६. | श्री. गजानन सीताराम बोरकर यांच्या वाढदिवाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. दीपक यांजकडून. | ५,००० |
| ७. | श्री. विनायक विष्णु पावशे यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती. सुनंदा (हंसा) व पुत्र प्रशांत यांजकडून. | १,००,००० |
| ८. | श्रीमती इंदू व श्री. सदाशिव गणपत वागळे यांच्या स्मरणार्थ भाचा श्री. बाळकृष्ण वासुदेव धोंड यांजकडून. | ३०,००० |
| ९. | श्रीमती दुर्गाबाई व श्री. यशवंत वेंकटराव कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. व्यंकटेश व स्नुषा श्रीमती अश्विनी यांजकडून आईवडिलांच्या आशीर्वादाने मिळालेल्या नोकरीतून निवृत्त झालेल्या प्रसंगी. | ५,००० |
| १०. | श्री. अरुणकुमार सुंदरराव परुळकर यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती अश्विनी व जावई श्री. व्यंकटेश वेंकटराव कुलकर्णी यांजकडून वडील व सासरे अनुक्रमे यांच्या आशीर्वादाने मिळालेल्या नोकरीतून निवृत्त झालेल्या प्रसंगी. | २,५०० |
| ११. | श्रीमती स्नेहलता (सिंधू) व श्री. मारुती सोहिरोबा तेलंग यांच्या स्मरणार्थ पुत्र डॉ. गिरीश यांजकडून. | १,००,००० |
| १२. | श्रीमती सुशीला व श्री. देवीदास शांताराम कसबेकर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ कन्या श्रीमती आशा दार्नुले यांजकडून. | ५०,००० |
| १३. | श्रीमती सुमित्रा व श्री. जयवंत यशवंत नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. अजित यांजकडून. | ५,००० |

## वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. भूषण सुहास फेणे यांच्या २० व्या पुण्यतिथी निमित्त आईवडील श्रीमती सीमा व डॉ. सुहास गोविंद फेणे यांजकडून. | २०,००० |
| २. | श्रीमती स्नेहलता गोविंद कसबेकर यांच्या ५ व्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. विनय यांजकडून. | ३,००० |
| ३. | श्री. अनिल भालचंद्र तेलंग यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. पराग यांजकडून. | २०,००० |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती बन्सी धनंजय जोशी यांजकडून. | ३२,१९४ |
| २. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या ८७ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून. | १,५०१ |
| ३. | श्री. देवीदास गोविंद बोरकर यांच्या स्मरणार्थ पुतणी श्रीमती स्मिता प्रदीप लाड यांजकडून. | १,००१ |
| ४. | श्रीमती इंदू व श्री. सदाशिव गणपत वागळे यांच्या स्मरणार्थ भाचा श्री. बाळकृष्ण वासुदेव धोंड यांजकडून. | ३०,००० |
| ५. | पूर्वजांच्या स्मरणार्थ पितृपक्षानिमित्त अनामिकेकडून. | १,५०० |

**(ऊर्वरीत देणग्यांचा तपशील जागेअभावी पुढील अंकी)**

Regd. with registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80

**NKGSB Bank**
NKGSB Co-op. Bank Ltd.

# FD
INTEREST RATES (% p.a.)*
w.e.f. 03.09.2019

| Period | General Public/ Society Trusts/ Corporates | Senior Citizens |
|---|---|---|
| | SDR/ MIP / FDR / RD / QIRP | SDR/ MIP / FDR / RD / QIRP |
| 7 days to 90 days | 5.00% | 5.25% |
| 91 days to 180 days | 6.25% | 6.50% |
| 181 days to 364 days | 6.60% | 6.85% |
| Above 2 Years upto 7 Years | 6.75% | 7.00% |
| Above 7 Years upto 10 Years | 6.50% | 6.75% |

**DEPOSITS FROM 7 DAYS TO 184 DAYS ARE SHORT TERM DEPOSITS (SDR)**

**ANNAPURNA TAX BENEFIT SCHEME – Tax Benefit upto Rs. 1.50 lakhs per investor u/s 80 C**

| For all category (Individual / HUF/ Senior Citizen) | ATBS (FDR) | ATBSQ (QIRP) |
|---|---|---|
| Scheme (5 Years – No Premature Payment) | 6.50% | 6.50% |

**1 YEAR - 2 YEARS**
*QIRP - EARN HIGHER CUMULATIVE YIELD
*QIRP FDR MIP RD | GENERAL PUBLIC 7.30% | SENIOR CITIZEN 7.60%

**200 DAYS**
SPECIAL DEPOSIT SCHEME
FDR | GENERAL PUBLIC 7.50% | SENIOR CITIZEN 7.75%

**999 DAYS**
SPECIAL DEPOSIT SCHEME
FDR | GENERAL PUBLIC 7.25% | SENIOR CITIZEN 7.50%

*MIP - MONTHLY INTEREST WILL BE CREDITED AT A DISCOUNTED RATE
*RD/MIP/QIRP SHOULD BE FOR MINIMUM PERIOD OF 12 MONTHS ONLY
*INTEREST RATES FOR FDR/MIP/RD/QIRP PRODUCTS ARE APPLICABLE FOR ALL NRE AND NRO PRODUCTS.
NRE DEPOSITS SHOULD BE FOR MINIMUM ONE YEAR.
*1% PENALTY FOR PREMATURE WITHDRAWAL EXCEPT SENIOR CITIZENS
*0.50% PENALTY FOR PREMATURE WITHDRAWAL FOR SENIOR CITIZENS DEPOSITS MADE ON AND AFTER 03.09.2019
*INTEREST RATE ON AUTO SWEEP FACILITY WILL BE FLAT 3.25 % FOR ALL ENTITIES (NORMAL RESIDENTS)

हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.